७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. ०२ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# महायुतीचे सचिन अहिर यांची बिनविरोध निवड

## विधान परिषद उपसभापती निवडणूक : महाविकास आघाडीच्या उमेदवाराची ऐनवेळी माघार

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदावर अखेर शिवसेना (शिंदे गट) नेते सचिन अहिर यांची बिनविरोध निवड झाली. महायुतीचे उमेदवार म्हणून त्यांनी अर्ज दाखल केला होता, तर महाविकास आघाडीकडून शिवसेना (ठाकरे गट)चे जगन्नाथ अभ्यंकर रिंगणात होते. मात्र, सभागृहाची परंपरा आणि सर्वानुमते निवड व्हावी, या भूमिकेतून महाविकास आघाडीने उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आवाजी मतदानाद्वारे सचिन अहिर यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडणुकीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुती आणि विरोधी पक्षातील सदस्य सभागृहात उपस्थित होते. विधान परिषदेतील संख्याबळ लक्षात घेता महायुतीचा विजय जवळपास निश्चित मानला जात होता. तरीही संसदीय परंपरा जपण्याच्या उद्देशाने मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधी पक्षाला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले. यानंतर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी सभागृहात घोषणा करत, "सभागृहाची इच्छा सर्वानुमते निवड व्हावी अशी आहे. त्यामुळे आम्ही आमचा उमेदवारी अर्ज मागे घेत आहोत," असे सांगितले. त्यानंतर सभागृहात आवाजी मतदान घेण्यात आले आणि सचिन अहिर यांची विधान परिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

सचिन अहिर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, “सचिन अहिर यांच्या निवडीबद्दल विरोधी पक्षाचेही आभार मानतो. त्यांनी सभागृहाची परंपरा जपत उमेदवारी मागे घेतली.” फडणवीस यांनी 1999 सालच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, "मी आणि सचिन अहिर एकाच वर्षी प्रथमच विधानसभेत निवडून आलो होतो. 'अहिर' या शब्दाचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. माझा त्यांच्याशी अनेक वर्षांचा परिचय असून ते अत्यंत निर्भीडपणे काम करणारे लोकप्रतिनिधी आहेत."

ते पुढे म्हणाले, "उपसभापतीपदावर बसल्यानंतर प्रत्येक सदस्याला समान न्याय द्यावा लागतो. सचिन अहिर ही जबाबदारी अत्यंत सक्षमपणे पार पाडतील, असा मला विश्वास आहे."

मुख्यमंत्र्यांनी माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या कामाचाही गौरव केला. "संघर्षाच्या काळातही त्यांनी सभागृहाचे कामकाज अत्यंत प्रभावीपणे चालवले. प्रसंगी कठोर भूमिका घेत सभागृहाची प्रतिष्ठा जपली," असे फडणवीस म्हणाले.

सचिन अहिर यांच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, “मिल कामगार संघटनेतील कार्यकर्ते म्हणून त्यांनी राजकारणाची सुरुवात केली. 1999 मध्ये प्रथम आमदार झाले आणि त्यानंतर सलग तीन वेळा विधानसभेत निवडून आले.

2009 मध्ये त्यांनी राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. अभ्यासू मंत्री म्हणून त्यांची ओळख होती. एखादा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला की 'काय अपेक्षा आहे?' असे विचारून तो सोडवण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा," अशी आठवणही त्यांनी सांगितली. फडणवीस यांनी त्यांच्या प्रसिद्ध दहीहंडी उत्सवाचा आणि सामाजिक कार्याचाही उल्लेख करत, "योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे," असे म्हटले.

## मुंबईसह उपनगरात मुसळधार पाऊस, हवामान खात्याचा इशारा

**पालघर (दै. संध्या)**



■ जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश, २ जुलै रोजी शाळेला सुट्टी

मुंबईसह उपनगरात आज मुसळधार पाऊस पडला असून अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. त्यातच, हवामान खात्याने पुढील काही तास मुसळधार पावसाचा इशारा दिला असून पुढील 3 दिवस पावसाचा जोर राहणार असल्याचेही सांगण्यात आलं आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज पालघर जिल्ह्यातील वसई आणि विरारमध्ये मुसळधार पाऊस पडला. या पावसात अनेक वाहने वाहून गेली असून उपनगरातही जोर कायम आहे. त्यातच, हवामान विभागाने पालघर जिल्ह्यासाठी उद्या अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे. संभाव्य मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. पालघर जिल्ह्यात आज दिवसभर पावसाची जोरदार हजेरी कायम होती. अनेक भागांत रस्त्यांवर पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामान विभागाने पुढील 24 तासांत काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेतली असून, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## वायरी उघड्या, स्कुटीवरुन जाणाऱ्या दोन मुलींना करंट

**मुंबई (दै. संध्या)**



■ रस्त्यावरच कोसळल्या; पावसाच्या पाण्यात 5 वाहने गेली वाहून

नवी मुंबई : मुंबईसह उपनगरातील मुसळधार पावसामुळे वसईतील वाघराळ पाडा परिसरात बुधवारी भीषण घटना घडली. नाल्याला आलेल्या अचानक पुरामुळे पार्किंगमध्ये उभी असलेली तीन दुचाकी, एक वॅगनआर कार आणि मारुती कंपनीची एक इको कार पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दुसरीकडे नवी मुंबईत पावसाच्या पाण्यातून मार्ग काढत असताना दोन मुलींना वीजेचा धक्का बसल्याने रस्त्यावरच भयानक दृश्य पाहायला मिळालं. सुदैवाने एका धाडसी व्यक्तीच्या प्रसंगावधानतेमुळे दोन्ही मुलीचे प्राण वाचले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वसईत पावसाच्या पाण्यात अनेक वाहने वाहून गेली, घटनेदरम्यान इको कारमध्ये असलेले चंद्रकांत किणी यांनी प्रसंगावधान राखत धाडसी प्रयत्न केले. पाण्याचा वेग प्रचंड असतानाही त्यांनी दोघांना सुरक्षित बाहेर काढत त्यांचे प्राण वाचवले. त्यांच्या धाडसाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे नाल्याच्या पाण्याची पातळी अचानक वाढल्याने ही घटना घडली. काही क्षणांतच पाण्याच्या प्रवाहाने पार्किंगमधील वाहने अक्षरशः ओढून नेली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, वसई-विरार परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भाग जलमय झाले असून नागरिकांना आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नये तसेच नाले, ओढे आणि पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांपासून दूर राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# आभाळ फाटलं, मुंबई तुंबली : राज्यात पावसाचा हाहाकार

## कुठे झाडं पडली, तर कुठे रस्ते पाण्याखाली! मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा



**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्रात मान्सून चांगलाच सक्रिय झाला असून गेल्या 24 तासांत मुंबईसह उपनगरे, ठाणे, नवी मुंबई आणि कोकणात पावसाने अक्षरशः हाहाकार उडाला. मुसळधार पावसामुळे मुंबई आणि उपनगरांतील रस्ते वाहतूक आणि लोकल सेवेवर मोठा परिणाम झाला असून सखल भागात 2 ते 3 फुटांपर्यंत पाणी साचले आहे. अनेक ठिकाणी शाळा आणि इमारतींमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. मुंबईत सकाळपासूनच पावसाचा जोर कायम असून दादर, माटुंगा, सायन, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप आणि मुलुंड परिसरात पावसाची तुफान बॅटिंग सुरू आहे. अंधेरी सबवेमध्ये सुमारे अडीच फुटांपर्यंत पाणी साचल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला. वीरा देसाई रोडही पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. गोरेगावच्या फिल्म सिटी रोड आणि संतोषनगर परिसरातील मुख्य रस्त्यांवर 2 ते 3 फुटांपर्यंत पाणी साचल्याने वाहनचालकांची मोठी कोंडी झाली. पश्चिम द्रुतगती महामार्गावर जोगेश्वरीजवळ एसआरपीएफ कॅम्प समोर 2 ते 3 फूट पाणी साचल्याने महामार्गावरील वेग मंदावला. वरळी भागात आणि चेंबूरमध्ये अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले. वसईतील वाघराळ पाड्यात मुसळधार पावासामुळे पाण्याचा प्रवाह इतका तीव्र होता की, 3 दुचाकी आणि 2 कार वाहून गेल्या. सुदैवाने, एका कार चालकाने प्रसंगावधान राखून कारमधून उडी मारल्याने त्याचा जीव वाचला. नालासोपाऱ्यातील सेंट्रल पार्क आणि तुळींज परिसरात पाणी साचल्याने अंतर्गत वाहतूक विस्कळीत झाली. कल्याणमध्ये मुसळधार पाऊस झाल्याने शेतकरी जागृत मंडळ शाळेत पाणी शिरले, ज्यामुळे खबरदारी म्हणून विद्यार्थ्यांना तातडीने घरी सोडण्यात आले. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या 8 तासांत तब्बल 82.76 मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुख्य बाजारपेठ, वंदना डेपो, मासुंदा तलाव आणि कोपरी बारा बंगला परिसरात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. दुपारी 2.25 च्या सुमारास समुद्रात आलेल्या मोठ्या भरतीमुळ मुंब्रा भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली. सततच्या पावसामुळे मुंब्रा-शीळ मार्ग पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला असून अनेक वाहने पाण्यात अडकली आहेत. नवी मुंबईतील सानपाडा परिसरात रस्त्यांना अक्षरशः नदीचे स्वरूप आले असून अनेक वाहने पाण्यात बुडाली आहेत. सायन-पनवेल हायवेवर पाणी साचल्याने मैलोन्मैल वाहनांच्या रांगा लागल्या असून मोठी वाहतूक कोंडी झाली आहे.

### घरी जाण्याच्या वेळेत चाकरमान्यांची कोंडी

संध्याकाळच्या सुमारास लाखो चाकरमानी घरी जाण्यासाठी निघाले असतानाच पूर्व द्रुतगती महामार्गावर घाटकोपर, मुलुंड ते ठाणे दरम्यान पावसाचा जोर कमालीचा वाढला. दुपारी पाण्याचा निचरा झाला असला तरी संध्याकाळी पुन्हा सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे ठाण्याच्या दिशेने जाणारी वाहतूक अत्यंत संथ गतीने सुरू आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## कोल्हापूरच्या चंदगडमध्ये ५५ गावांचा हेरे सरंजाम प्रश्न कायमस्वरूपी निकाली

# २२ हजार कुटुंबांना मालकी हक्क

**कोल्हापूर (दै. संध्या)**



कृषी दिनाच्या दिवशीच चंदगड तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला असून 22 हजार कुटुंबांना शेतीचा मालकी हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ प्रलंबित असलेला चंदगड विधानसभा मतदारसंघातील 55 गावांचा हेरे सरंजाम प्रश्न अखेर कायमस्वरूपी मार्गी लागला. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मध्यरात्री विशेष तत्परता दाखवत घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयासाठी चंदगडचे आमदार शिवाजीराव पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

हेरे सरंजाम इनामातील जमीन प्रश्नामुळे गेल्या अनेक वर्षांपासून हजारो शेतकरी मालकी हक्कापासून वंचित होते. जमीन कसत असूनही त्यांच्या नावावर मालकी नोंद होत नसल्याने अनेक प्रशासकीय, आर्थिक आणि कायदेशीर अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर आमदार शिवाजीराव पाटील यांनी विधानसभेत, मंत्रालयात आणि विविध स्तरांवर हा प्रश्न सातत्याने मांडत शासनाकडे पाठपुरावा केला होता. शासनाच्या नव्या निर्णयानुसार सुमारे 22 हजार कुटुंबांना शेतीच्या मालकीचा अधिकार मिळणार असून 12 हजार 500 हेक्टरपेक्षा अधिक जमीन प्रत्यक्ष कुळांच्या नावावर होणार आहे. यामुळे अनेक पिढ्यांपासून सुरू असलेल्या संघर्षाला अखेर पूर्णविराम मिळणार आहे.

विशेष म्हणजे, जमीन हस्तांतरण प्रक्रियेमधील अनेक जाचक कागदपत्रांच्या अटी शासनाने रद्द केल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध दाखले, पुरावे आणि प्रशासकीय प्रक्रियांचा सामना करावा लागणार नाही. याशिवाय जमीन मालकीसाठी भरावी लागणारी नजराणा रक्कम पूर्णपणे माफ करण्यात आली आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्याही शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### ३५ वर्षांचा संघर्ष अखेर संपला

हेरे सरंजाम प्रश्नामुळे अनेक शेतकरी कुटुंबांना कर्ज, पीकविमा, अनुदाने तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत होत्या. जमीन मालकी नसल्यामुळे वारसा नोंदी, खरेदी-विक्री, बँक कर्ज आणि इतर व्यवहारही अडचणीत येत होते. आता शासनाच्या निर्णयामुळे या सर्व अडचणी दूर होऊन शेतकऱ्यांना कायदेशीर मालकी हक्क प्राप्त होणार आहे.

### निर्णयाचे प्रमुख मुद्दे

- ५५ गावांचा हेरे सरंजाम प्रश्न कायमस्वरूपी निकाली
- २२ हजार कुटुंबांना मिळणार शेतीच्या मालकीचा हक्क
- १२ हजार ५०० हेक्टर जमीन कुळांच्या नावावर
- कागदपत्रांच्या जाचक अटी रद्द
- नजराणा रक्कम पूर्णपणे माफ
- ३० वर्षांहून अधिक काळाचा संघर्ष संपुष्टात
- आमदार शिवाजीराव पाटील यांच्या पाठपुराव्याला यश.


हेरे सरंजाम प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा यासाठी आमदार शिवाजीराव पाटील यांनी आमदार होण्यापूर्वीपासूनच आंदोलनात्मक भूमिका घेतली होती. आमदार झाल्यानंतर त्यांनी हा विषय विधानसभेत वारंवार उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अनेक वेळा बैठका घेऊन त्यांनी हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली होती. या निर्णयामुळे चंदगड तालुक्यासह संपूर्ण परिसरातील शेतकरी कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, हा निर्णय ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# राज ठाकरेंच्या वक्तव्यावरुन हक्कभंग होऊ शकतो

## फोडाफोडीचं राजकारण तापलं, राम कदमांचा मनसेप्रमुखांना इशारा

**मुंबई (दै. संध्या)**





राज्यात सुरू असलेल्या फोडाफोडीच्या राजकारणावरुन मनसेप्रमख राज ठाकरेंनी पुन्हा एकदा भाजपवर निशाणा साधला. तसेच, एका पक्षातून फुटून दुसऱ्या पक्षात जाणाऱ्या आमदार-खासदारांनाही त्यांनी लक्ष्य केलं. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही सुरु आहे ते घाणेरडं आणि भयानक आहे. सध्याच्या परिस्थितीत प्रश्न विकत घेणाऱ्यांबाबत नाही तर विकल्या जाणाऱ्यांबाबत आहेत. हे देहविक्रीला तयार असतील तर गिऱ्हाईकं तयार आहेतच, अशी बोचरी टीका राज ठाकरे यांनी केली. त्यानंतर, आता भाजप आमदार राम कदम यांनी राज ठाकरेंच्या वक्तव्यावरुन पलटवार केला असून यात हक्कभंग होऊ शकतो, असा इशारा देखील त्यांनी दिलाय.

ठाकरे गटातील फुटीर खासदार-आमदारांबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले की, भविष्यात या सगळ्याचे परिणाम भाजपलाही भोगावे लागतील. आता, राज ठाकरेंच्या वक्तव्यावरुन आमदार राम कदम यांनी पलटवार केला आहे. राज ठाकरेंचे विधान आहे, त्यात हक्कभंग होऊ शकतो, त्यांचे विधान विशेषाधिकाराचे हनन करणारे आहे. मनात त्यांच्याबद्दल आदर आहे, मी हक्कभंग टाकणार नाही, मात्र विधान तसं आहे, असे म्हणत भाजप आमदार राम कदम यांनी राज ठाकरेंनी फोडाफोडीच्या राजकारणावरुन केलेल्या वक्तव्यावर भाष्य केलंय. राज ठाकरेंचा छळ उद्धव ठाकरेंनी केला, म्हणून त्यांनी पक्ष सोडला. उद्धव ठाकरेंनी परिस्थिती निर्माण केली म्हणून पक्ष सोडावा लागला होता. स्वत:चं घर सांभाळता येत नाही, यात भाजपचा संबंध येतो कुठे? असा सवाल देखील राम कदम यांनी विचारला आहे.

राज ठाकरेंच्या विधानावर हक्कभंग प्रस्ताव येऊ शकतो, 20-20 लाख लोकांमधून निवडून येणारी लोकं पक्ष बदलतात याचे काही कारण असेल की नसेल. कोणता कॅबिनेट मंत्री सोडून गेला असं कुठे झालं आहे का कधी? एकनाथ शिंदेंसोबत गेले होते ते परत निवडून आलेत ना. लोकांना रोष वाटला असता तर ते पडले असते. खासदार आत्ता आलेत तर एकाचा फेल्युअरचा रेट दाखवा ना, असे देखील राम कदम यांनी म्हटले.

भाजपकडे 137 आमदार आहेत, आमचे आमदार खासदार वाढत आहेत, भाजप दिवसेंदिवस मोठा पक्ष होतोय, आकड्यांवरुन दिसतंय ना. त्यामुळे, ह्या विधानांचा भाजपशी संबंध नाही, त्यांनी सल्ला उद्धव ठाकरेंना द्यावा, जवळचे लोक का सोडून जात आहेत. जवळची माणसं सोडून जात असतील तर स्वभाव बदलला पाहिजे, उद्धव ठाकरे यांच्या पापाची फळं त्यांना मिळत आहेत, अशा शब्दात राम कदम यांनी राज ठाकरेंच्या वक्तव्यावरुन पलटवार केला आहे. दरम्यान, उद्या सत्ता गेल्यावर भाजपलाही या गोष्टींचा त्रास होईल. आपण काय करतोय, कुठपर्यंत जायचं, याला मर्यादा आहेत की नाही? ज्या ज्या वेळेला जगात एखाद्या सत्ताधाऱ्याने विरोधकांना संपावले आहे, त्यावेळी त्यांच्यातूनच दुश्मन तयार झाले आहेत.

# संपादकीय

## प्रभू, उठा, हाती कोदंड घ्या ! रामभक्तांच्या श्रद्धेला धक्का देणाऱ्यांचा समाचार घ्या

रामचरितमानसच्या उत्तरकांडात कागभुशुंडी नावाच्या रामभक्ताची आख्यायिका आहे. कागभुशुंडी व गरूड यांच्यातील संवादाने ती कथा प्रवाहित होते. प्रभू श्रीरामांच्या परमभक्तीमुळे अमरत्व प्राप्त झालेले कागभुशुंडी प्रत्येक रामावतारात काग म्हणजे कावळ्याचे रूप धारण करून अयोध्येच्या अंगणात येतात, बाल श्रीरामांसोबत खेळतात, रामललाचे उष्टे खातात. एकदा कागभुशुंडी खेळता-खेळता लहानग्या प्रभू श्रीरामांच्या हातातून मालपुआ हिसकावून घेतात. तेव्हा, रामलला आधी रडतात आणि नंतर आपल्या दिव्यरूपाची रामलीला दाखवितात. जेमतेम अडीच वर्षांपूर्वी, दि. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येच्या भव्य मंदिरात प्रतिष्ठित झालेल्या रामललांच्या दानपेटीतील पैशाचा मालपुआ कागभुशुंडीसारखाच कथित रामभक्तांनी चोरल्याचे प्रकरण सध्या गाजत आहे. ज्यांनी प्रभू श्रीरामांच्या जन्मस्थळी भव्यमंदिर व्हावे म्हणून आंदोलने केली, लाठ्याकाठ्या खाल्ल्या, गोळीबार झेलला अशा लाखो लोकांना, सोबतच देशविदेशातील कोट्यवधी रामभक्तांना दानचोरीच्या प्रकरणाने जबर धक्का बसला आहे. तथापि, रोख रक्कम, चांदीच्या विटा किंवा सोन्याची आभूषणे चोरीप्रकरणी ज्या आठजणांना अटक झाली आहे, ते सगळे न्यास किंवा बँकेचे कर्मचारी म्हणजेच छोटे मासे आहेत. अटक झालेल्या संशयितांच्या मालमत्ता डोळे दीपविणाऱ्या आहेत. जेमतेम काही हजार रुपये पगार असलेल्यांनी लाखालाखांचे इमले उभे केले आहेत. त्यांच्या बँक खात्यात लाखो रुपये सापडले आहेत. अगदी अलीकडे म्हणजे अवघ्या चाळीस दिवसांत तब्बल सत्तरवेळा दानपेट्यांमधील रक्कम चोरीला गेल्याची दृश्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी टिपली आहेत. सारेकाही धक्कादायक आहे आणि तरीही बड्या मंडळींना अद्याप हात लागलेला नाही. महंत नृत्यगोपाल दास हे श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे अध्यक्ष आहेत. तथापि, सगळा कारभार चंपत राय, अनिल मिश्रा, गोविंददेव गिरी आदींच्या हातात आहे. ही दानचोरी काही वरिष्ठांच्या आशीर्वादाशिवाय शक्यच नाही, अशी टीका होताच यापैकी राय व मिश्रा यांनी नैतिकदृष्ट्या वगैरे राजीनामा दिला आहे. कोषाध्यक्ष गोविंददेव गिरी यांनी अद्याप चकार शब्द काढलेला नाही. अयोध्या आंदोलन, बाबरी मशिदीचे पतन, सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा व भव्य मंदिराची निर्मिती या घटनाक्रमामुळे मुळात प्रभू श्रीराम हे देशाचे राजकीय देव बनले आहेतच. त्यामुळे राममंदिर व राजकारण वेगळे करता येत नाही. तिथे आधी जमीन घोटाळ्याचा आरोप झाला. दोन कोटी रुपये किंमत असलेली जमीन काही मिनिटांनंतर न्यासाने तब्बल साडेअठरा कोटींना खरेदी केल्यावरून आरोप-प्रत्यारोप झाले. परंतु देश राममंदिर उभारणीच्या आनंदात असल्याने प्रकरण फार पेटले नाही. आता खुद्द उत्तर प्रदेश सरकारच्या विशेष तपास पथकाने दानचोरी चव्हाट्यावर आणली. परिणामी, भक्तांनीच प्रभू श्रीरामांच्या खजिन्यावर डल्ला मारल्याच्या मुद्द्यावर राजकीय रणकंदन उभे राहिले आहे. पंतप्रधान कार्यालय तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा विश्व हिंदू परिषदेवर टीकेची झोड उठवली जात आहे. समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव, आम आदमी पक्षाचे संजय सिंग ही मंडळी अधिक आक्रमक आहेत. ही टीका स्वाभाविक आहे. तथापि, 'तुम्ही कधीच रामजन्मभूमीचा आदर केला नाही, मंदिराच्या उभारणीला समर्थन दिले नाही, त्यामुळे तुम्हाला देणग्यांच्या चोरीबद्दल बोलायचा अधिकार नाही. हिंमत असेल तर मथुरेतील श्रीकृष्ण मंदिराबद्दल बोला', अशा आशयाचा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ तसेच हिंदुत्ववादी संघटनांकडून होणारा त्या टीकेचा प्रतिकार हास्यास्पद आहे.

## संस्कृत सुभाषित

तदेव युक्तं भैषज्यं यदारोग्याय कल्पते।।

आरोग्याच्या प्राप्तीसाठी जे खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरते, तेच औषध योग्य होय.

## गुरु वचन



### दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होणे हीच इश्वर सेवा

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख-सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या-बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

## उपदेशकथा

### तन्मयता

परलोकवासी प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहमान यांची ही गोष्ट. रंगांच्या दुनियेत दंग झालेला हा कलावंत बाजारात गेला नि घेऊन आला दोन रसरशीत कृष्णाकाठची वांगी, तजेलदार भोपळी मिरच्या, शताक्ष सीताफळ नि हिरवीगार कोथिंबीर जुडी. त्यावेळी गोविंदराव टेंब्यांनी विचारलं, 'काय, बाजार आटोपला वाटतं?' चित्रकार उत्तरले, 'अहो, ही भाजी नव्हे चित्रं आहेत. ही वांगी बेटी फार त्रास देणार बघा. वा, वा काय पण रंग आहे.' टेंबे म्हणाले, 'वांगी खाल्ली तरीही त्रास देतातच !' आबालाल यावर उत्तरले, 'अरे, खुदानं वांगी निर्माण केली ती मुळी चित्र बहारीनं रंगवता यावं म्हणून ! खाण्यासाठी नव्हे.' इतके ते सृष्टीतील रंगवृष्टीशी तन्मय झालेले अवलिया चित्रकार होते.

कथा उपदेश : प्रतिभावंत चित्रकार मायकेल एंजेलोने म्हटले आहे की, ज्याला चित्रकार व्हायचं त्याला अवतीभवती सर्वत्र चित्रं दिसली पाहिजेत. जमिनीवर, झाडाझुडपांवर, आभाळात सगळीकडे निसर्गाची तुलिका अजब रेखाटनं करीत असते.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:द्वितीया ०९:३८:०९ |
| २ जुलै २०२६ | नक्षत्र:उत्तराषाढा |
| गुरुवार | ०९:२७:०२ |
| विक्रम संवत्- २०८२ | योग:वैधृति १६:३८:४२ |
| निज ज्येष्ठशके | करण:गर ०९:३८:०९ |
| संवत्- १९४८ | करण:वणिज २२:३१:५३ |
| संवत्सर -पराभवनाम | सूर्य:मिथुन |
| अयन- दक्षिणयन | चन्द्र:मकर |
| मास- निज ज्येष्ठ | हिजरी सन् - १४४८ |
| ऋतु- सौर वर्षा | मुस्लिम मास - मोहरम |
| कृष्ण पक्ष | तारीख - १६ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | | 1 | | | 7 | | |
| 7 | 5 | | | | 3 | | 2 | |
| 1 | | | | 2 | 4 | | | |
| 4 | 2 | | 3 | | 6 | | | |
| 9 | 3 | | 5 | | 8 | | 6 | 2 |
| | | | 4 | | 2 | | 3 | 9 |
| | | | 2 | 4 | | | | 5 |
| | 4 | | 6 | | | | 9 | 3 |
| | | 2 | | | 5 | | 8 | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 6 | 8 | 4 | 2 | 1 | 3 | 7 |
| 7 | 3 | 4 | 9 | 1 | 6 | 5 | 8 | 2 |
| 1 | 8 | 2 | 5 | 3 | 7 | 6 | 9 | 4 |
| 8 | 7 | 5 | 1 | 9 | 4 | 2 | 6 | 3 |
| 9 | 2 | 1 | 6 | 8 | 3 | 4 | 7 | 5 |
| 6 | 4 | 3 | 2 | 7 | 5 | 8 | 1 | 9 |
| 4 | 5 | 8 | 7 | 6 | 9 | 3 | 2 | 1 |
| 3 | 6 | 9 | 4 | 2 | 1 | 7 | 5 | 8 |
| 2 | 1 | 7 | 3 | 5 | 8 | 9 | 4 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९२७ – पॅलेस्टाईनला भूकंपाचा धक्का.
- १९८२ – सोयोज टी-६ पृथ्वीवर परतले.
- १९९४ – पश्चिम कॅरीलीना येथे युएसचा एअर डीसी-९ कोसळून ३७ ठार.

### राष्ट्रीय

- १९४० – स्वतंत्रतासेनानी सुभाष चंद्रबोस यांना कलकता येथे अटक.
- १९७२ – भारत आणि पाकिस्तानने शांतता करारावर स्वक्षरी केली.
- २००६ – कानपुरच्या शिवराजपुर ठाण्याच्या पटकापुर गावाजवळ एक उच्चदाबाची वीज तार वऱ्हाडाच्या बसवर पडल्याने नऊ जण ठार व तीन जण जखमी झाले.
- २००६ – लखनौच्या ठाकूरगंज ठाणे हद्दीत चार मुले गोमती नदीत बुडून मरण पावले.
- २००७ – सचिन तेंडुलकर १३ वेळा 'मालिकावीर'चा पुरस्कार प्राप्त करणारा पहिला खेळाडू बनला.
- २००७ – हिमाचल प्रदेशाच्या सिरमौर जिल्ह्यात एक बस १००० फूट खोल दरीमध्ये कोसळून १८ प्रवासी ठार व २५ प्रवासी जखमी झाले.

### जन्म

- १४९२ – इलाझेबथ टुडर, इंग्लीश राजकुमारी.
- १८७७ – हरमन हेस, जर्मन लेखक.
- १८८० – गणपतराव बोडस, श्रेष्ठ गायक, अभिनेतेचा जन्म.
- १९०३ – ओलव पाचवा, नार्वेचा राजा.

### निधन

- १९२८ – नंदकिशोर बल, उडिया भाषेतील श्रेष्ठ कवी, कादंबरीकार यांचे निधन.
- १९६३ – सेट बार्नेस निकोल्सन, अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ यांचे निधन.

## : SMS :

Ek Kisan Gadi Mai Gehun le Ja raha tha Police ne usko rok liya.
Sipaahi: Kya Hai Isme?
Kisan: Gehun.
Sipahi: Aby Hath Mila! Main bhi GAY Hun.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.६ | २५.८ |
| अहमदनगर | ३१.८ | २३.१ |
| अकोला | ३७.८ | २४.७ |
| अमरावती | ३२.७ | २५.२ |
| बीड | ३८.१ | २५.१ |
| भंडारा | ३४ | २७ |
| बुलढाणा | ४७.२ | ३३.५ |
| चंद्रपूर | ३८.४ | २५.८ |
| चेन्नई | ४०.२ | ३२ |
| नवी दिल्ली | ४५ | ३७.८ |
| धुळे | ३८.१ | २६.४ |
| गोंदिया | ३५.६ | २७.२ |
| जळगाव | ३७.७ | २४.६ |
| कोल्हापूर | २५.९ | २२.२ |
| लातूर | ३३.२ | २३.७ |
| मुंबई | ३६.२ | ३०.८ |
| नागपूर | ३३.३ | २६.३ |
| नांदेड | ३७ | २५.५ |
| नंदूरबार | ३४.७ | २६.५ |
| नाशिक | ३०.६ | २३.४ |
| पुणे | २६.५ | २२.८ |
| पंढरपूर | ३२.९ | २४.४ |
| सातारा | २९.५ | २१ |
| सांगली | २७.२ | २३.१ |
| सोलापूर | ३२ | २४.७ |
| वर्धा | ३५.२ | २५.५ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. मदतीची अपेक्षा करू नका.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे जीवनात बदल घडून येईल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा:दक्षिण शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल.

**मकर :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व सामान्य स्तरावरची कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कौटुंबिक समस्या हल होतील.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९८



**आडवे शब्द**

१. मिठाई तयार करणारा
३. ज्वारीची वाळलेली ताटे, गाय-बैलाचे खाद्य
५. सवाद्य, गाजावाजा करीत
९. सुमारे दोन मैल
११. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
१३. तंबूवजा घर
१४. रसपूर्ण, रसाळ
१७. लोकनाट्यातील कलाकार
१९. हिदीत प्रवास
२१. दरवाजा
२२. पाताळ
२४. बोकड
२६. कोवळी फांदी
२७. हिमालय सर करणारा शेर्पा
२८. द्रव्य, किंमत
३०. न्हाव्याची हत्याराची पिशवी, पडशी
३२. युद्धातील वीरश्रींची घोषणा
३५. समुद्राच्या लाटांचा आवाज
३६. गीत गाणे
३७. धातुचा धागा
३८. व्यापारातील नुकसान, फटका, हादरा
३९. मोठी टोपली, फलक
४१. आयुष्य
४३. घर
४५. ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड
४८. कडक व चिवट
४९. एकाक्षरी प्रश्न
५१. अघळपघळ, स्वैर
५३. हिस्सा
५४. संथपणे
५५. माफी
५६. संतोष, आनंद
५७. प्रतिबिंब दाखविणारी काच
५८. अंगावरील बारीक केस
६०. केस काळे करण्याचे साधन
६१. आवर घालणारी वादी
६२. सैल झालेले (वस्त्र)
६४. आश्चर्याने थक्क होणे
६७. लक्ष्मीपती
६८. सन्मानाची रक्कम
७०. चांदणी
७२. धमनी
७४. गप्प बसणे
७६. इमारतीतील घर, फ्लॅटला मराठी शब्द
७८. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्त्राव
७९. दागदागिने
८०. रड्या मनुष्य

**उभे शब्द**

१. सहस्त्रवेळा
२. चणचण
४. लहान मुलांची गाणी
५. भांडणे, चर्चा
६. शोध
७. गालाची बाजू
८. तात्पर्य, अर्थ, सार
१०. सदोदित
१२. आठवाड्याचा दिवस
१५. अखेरीस
१६. विष्णूचा एक अवतार
१८. श्रीमंत
२०. विहीरीतून पाणी काढण्याचे यंत्र
२३. समुद्र
२४. तोंड खाली घातलेला
२५. सततचे नामस्मरण
२९. प्रेम, माया
३१. समीक्षक
३३. सीमा
३४. जयपराजय
३६. कपाळ फुटणे
४०. हिंमत
४२. समुद्रातील अग्नी
४४. निराश
४५. फुलेफळे यांचे शेत
४६. युद्ध
४७. प्रेम, माया, लाड
४८. पुष्कळ
५०. भर दिवसा
५२. जास्तीत जास्त व कमीत कमी
५४. तात्पर्य
५६. अखंडीतपणा
५७. आंब्यातील द्रव
५९. देश, जमीन
६३. फळातील मगज
६५. अवधान, लक्ष
६६. ठेकेदार
६९. टक्कर
७१. फळातील द्रव
७२. होकारच्या विरुद्ध
७३. सहाय्य
७४. मजा, गंमत
७५. मेहरबानी
७७. मेहरबानी
७७. दु:ख, खेद, सल
७८. लुसलुशीत

**जम्बो शब्दकोडे क्र. ९९७ चे उत्तर**

आडवे उत्तर १.सारेगमपधनी ५.गंगायमुना ७.कला ९.वन ११.मळभ १२.रजत १३.साधनसामग्री १५.मखलाशी १७.सवड १८.परका २०.अफलातून २३.उमा २५.कारखानदार २७.टर २८.यदा ३०.परकर ३२.सदा ३३.कळक ३४.जनन ३५.आदानप्रदान ३७.झालर ३८.रमणी ४०.पार ४१.कपाळ ४३.साम्य ४४.मोद ४५.समर ४८.गिरणी कामगार ४९.जळवात ५१.साखळी ५२.डाकिनी ५४.रज ५५.जावई ५८.खरकटे ६१.पळतपळत ६४.गलत ६५.रासगरबा ६७.रमा ६९.मायबोली ७०.नवनीत ७१.डास ७२.तथा

उभे उत्तर : १.साधारण २.गवत ३.मन ४.धडधड ६.मुद्दाम ७.कळशी ८.लाभ १०.किसान ११.मला १३.ग्रीष्म १६.खटला १७.सरकार १९.खानदान २०.अटळ २१.फरक २२.नयनरम्य २३.उपकार २४.मार २६.खासदार २९.दान ३१.कहाणी ३३.कनक ३४.जलसा ३५.आपादमस्तक ३६.प्रथम ३९.मगर ४२.पारावार ४४.मोका ४५.सरडा ४६.रजनी ४७.ओळी ४८.गिरिजा ५०.तज ५१.सागर ५३.किस्मत ५६.वरमाय ५७.तुळस ५८.खराबा ५९.कसरत ६०.जंगली ६१.पतन ६२.परात ६३.तगडा ६६.रस ६८.माथा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.




आकाश शैक्षणिक सेवा लिमिटेडने

## राष्ट्रीय वैद्य दिन साजरा करत भावी वैद्यकीय तज्ज्ञांचा केला गौरव

पुणे (दै. संध्या)

■ वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील ३७ वर्षांच्या यशस्वी परंपरेवर टाकला प्रकाश

भारतातील अग्रगण्य स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण संस्था आकाश शैक्षणिक सेवा लिमिटेड यांनी राष्ट्रीय वैद्य दिनानिमित्त वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणाऱ्या आपल्या माजी विद्यार्थ्यांचा तसेच विविध नामांकित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय पदवी (एमबीबीएस)चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव केला. या उपक्रमातून देशाच्या आरोग्यसेवा क्षेत्रासाठी सक्षम वैद्यकीय तज्ज्ञ घडविण्याच्या संस्थेच्या ३७ वर्षांच्या उल्लेखनीय योगदानावर प्रकाश टाकण्यात आला.

या कार्यक्रमातून वैद्यकीय क्षेत्रासाठी सक्षम मनुष्यबळ घडविण्याच्या संस्थेच्या समृद्ध परंपरेचा गौरव करण्यात आला. गेल्या जवळपास चार दशकांपासून आकाश शैक्षणिक सेवा लिमिटेड वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असून, आजपर्यंत आठ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळवून देण्यात संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

वार्षिक राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) मधील उल्लेखनीय यशामुळे संस्था देशभरात ओळखली जाते. मात्र, संस्थेची खरी ताकद ही अनेक पिढ्यांतील विद्यार्थ्यांच्या यशस्वी कारकिर्दीतून निर्माण झालेल्या विश्वासार्ह परंपरेत आहे. गेल्या दहा वर्षांत आकाशच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गुणवत्ता क्रमवारीत प्रथम क्रमांक तब्बल १३ वेळा पटकावला आहे. याच कालावधीत राष्ट्रीय गुणवत्ता क्रमवारीतील पहिल्या दहामध्ये ६४ टक्के आणि पहिल्या शंभरमध्ये ५० टक्के विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहे.

राष्ट्रीय वैद्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुणे व परिसरातील १० माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. हे विद्यार्थी सध्या वैद्यकीय व्यवसायात कार्यरत असून काही विद्यार्थी वैद्यकीय पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. त्यांच्या यशस्वी प्रवासाचा गौरव करण्याबरोबरच त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाचाही यावेळी विशेष उल्लेख करण्यात आला.

यावेळी उपप्रादेशिक संचालक राहुल त्यागी म्हणाले, "राष्ट्रीय वैद्य दिन हा समाजाच्या आरोग्यासाठी आणि जनकल्याणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांचा गौरव करण्याचा दिवस आहे. गेल्या ३७ वर्षांहून अधिक काळ विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील स्वप्ने साकार करण्यासाठी मार्गदर्शन करताना भारताच्या आरोग्य व्यवस्थेला सक्षम मनुष्यबळ देण्याचे कार्य आम्ही सातत्याने करत आहोत. आमच्या माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करणे आणि भावी वैद्यकीय तज्ज्ञ घडविण्याच्या आमच्या वचनबद्धतेची पुनर्प्रतिज्ञा करणे, हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे."

सध्या भारतातील वैद्यकीय

## ‘महाराष्ट्र कृषी दिना’चा महायुती सरकारला विसर

पुणे (दै. संध्या)

■ काँग्रेसची टीका

■ स्व. वसंतराव नाईक हे महाराष्ट्रातील कृषी क्रांतीचे जनकत्यांच्या कार्याचे स्मरण ठेवावे – गोपाळदादा तिवारी



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर 'महाराष्ट्र कृषी दिन' साजरा केला जात असताना, राज्यातील महायुती सरकारला या दिवसाचा विसर पडल्याची टीका प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. पुण्यातील काँग्रेस भवन येथे स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. तिवारी म्हणाले की, स्व. वसंतराव नाईक हे संयुक्त महाराष्ट्राचे तिसरे मुख्यमंत्री असून, कोणतीही आमदार किंवा पक्ष फोडाफोड न करता लोकशाही मूल्यांच्या आधारे सलग अकरा वर्षे मुख्यमंत्रीपद भूषविणारे राज्याचे एकमेव नेते होते. महाराष्ट्राच्या कृषी, ग्रामीण आणि औद्योगिक विकासाला त्यांनी दिलेली दिशा आजही आदर्शवत आहे. त्यामुळे त्यांना "महाराष्ट्रातील कृषी क्रांतीचे जनक" म्हणून ओळखले जाते.

ते पुढे म्हणाले की, यवतमाळ जिल्ह्यातील गहुली या छोट्याशा गावातून बंजारा समाजातील नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या स्व. वसंतराव नाईक यांना काँग्रेस पक्षाने संधी देत सामाजिक समतेचा मजबूत पाया घातला. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्यात हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, पंचायत राज व्यवस्थेला बळ दिले आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा दिली. १९७२ च्या भीषण दुष्काळाचा उल्लेख करताना तिवारी म्हणाले की, त्या कठीण काळात स्व. नाईक यांनी सिंचन प्रकल्पांना प्राधान्य दिले, शेती उत्पादन वाढविण्यासाठी ठोस धोरणे राबविली आणि महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी मोठे योगदान दिले. ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी रोजगार हमी योजनेचा पाया रचला. दुग्धोत्पादनाला चालना देत श्वेतक्रांतीला गती दिली, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून औद्योगिकीकरणाला चालना देऊन रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण केल्या.

"अशा दूरदृष्टीच्या आणि कर्मयोगी नेतृत्वाचा 'महाराष्ट्र कृषी दिना'निमित्त शासन स्तरावर योग्य सन्मान होणे अपेक्षित होते. मात्र, महायुती सरकारने या दिवसाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे," असा आरोपही तिवारी यांनी केला.

यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राज्यात चांगला पाऊस पडून शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी यावी, अशी प्रार्थना करण्यात आली तसेच राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना 'महाराष्ट्र कृषी दिना'च्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाला पुणे शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत जगताप, दीप्ती चौधरी, राजाभाऊ कदम, गुलामहुसेन खान, भगवान कडू, ऋग्वेदिता सपकाळ, दीपक ओव्हाळ, शबीर शेख, धनंजय पाटील, हरिदास आडसुळ, देविदास लोणकर, दादासाहेब कामठे, राजेंद्र पडवळ, रोहित साळवे, आबा तरवडे, धनंजय दाभाडे, ॲड. फैय्याज शेख, प्रवीण करपे, रवी आरडे, अमित कांबळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आकर्षण कटियार यांच्यामुळे बॉलिवूड पुण्याच्या अधिक जवळ

पुणे (दै. संध्या)

■ 'अल्फा'च्या प्रचारासाठी आलिया भट्टची पुण्यात हजेरी; पुणेकरांच्या प्रतिसादाने अभिनेत्री भारावली

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट नुकतीच तिच्या आगामी 'अल्फा' चित्रपटाच्या प्रचारासाठी पुण्यात आली होती. शहराची समृद्ध संस्कृती, चविष्ट खाद्यसंस्कृती आणि पावसाळ्यातील आल्हाददायक वातावरणाचे तिने मनापासून कौतुक केले. पुणेकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ती विशेष भारावून गेली. या प्रचार मोहिमेचे यशस्वी नियोजन फ्रीकआऊट एंटरटेनमेंटचे प्रमुख आकर्षण कटियार यांनी केले. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन, चाहत्यांचा मोठा सहभाग आणि प्रचाराची प्रभावी मांडणी यामुळे हा कार्यक्रम विशेष ठरला. गेल्या १५ वर्षांपासून मनोरंजन क्षेत्रात कार्यरत असलेले आकर्षण कटियार यांनी अनेक नामांकित बॉलिवूड कलाकारांना पुणेकरांच्या भेटीस आणले आहे. चित्रपटांच्या प्रचारासाठी पुणे हे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळख निर्माण करण्यात त्यांचा मोठा वाटा असल्याचे मानले जाते.

यापुढेही विविध मोठ्या चित्रपटांच्या प्रचारासाठी आघाडीचे कलाकार पुण्यात आणण्याचा मानस असल्याचे आकर्षण कटियार यांनी सांगितले. त्यामुळे बॉलिवूड आणि पुणे यांच्यातील सांस्कृतिक व मनोरंजन क्षेत्रातील नाते अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त काँग्रेस भवन येथे विनम्र अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची जयंती पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी व पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून काँग्रेस भवन येथे साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना दीप्ती चवधरी म्हणाल्या की, "वसंतरराव नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ प्रगतीशिल शेतकरी व राजकिय नेते होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी सर्वाधिक काळ विराजमान होते. वसंतराव नाईक हरितक्रांती, पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात. १९७२ मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबविल्या. शेती व शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कृषी संस्कृतीचा पूनरूत्थान करीत त्यांनी देशभरात नावलौकिक मिळवला." यानंतर पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले की, “वसंतराव नाईक यांनी आधुनिक भारतीय शेती आणि शेतकऱ्यांचा मान उंचविला. प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत एकनाथराव पवार यांनी आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषी संत या शब्दात वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे. तसेच शेतकऱ्यांचा जाणता राजा, हरित योध्दा म्हणूनही त्यांना संबोधतात. आपल्या राजकिय कारकिर्दीमध्ये त्यांनी अनेक उल्लेखनिय काम केले आहे.” यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते गोपाळ तिवारी, पुणे शहर काँग्रेस कमिटीचे खजिनदार चंद्रशेखर कपोते, राजाभाऊ कदम, रविंद्र आरडे, सेवादलाचे लतेंद्र भिंगारे, राजेंद्र पडवळ, भगवान कडू, धनंजय दाभाडे, फैय्याज शेख, दिपक ओव्हाळ, अमित कांबळे, आबा तरवडे, शब्बीर शेख, हरिदास अडसूळ, प्रविण करपे, धनंजय पाटील, देवीदास लोणकर, दादासो कामठे, रोहित साळवे, सागर खांदवे आदी उपस्थित होते.

### 'साथी' पोर्टलच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे विभागस्तरीय प्रशिक्षण संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : पुणे येथे 'साथी' पोर्टलचे विभागस्तरीय प्रशिक्षण संपन्न झाले. आयुक्त (कृषी) सुरज मांढरे, संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) सुनील बोरकर आणि विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणास पुणे, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यांतील ९८ कृषी अधिकारी व गुणवत्ता नियंत्रणाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये साथी पोर्टलची कार्यप्रणाली, बियाणे प्रमाणीकरण प्रक्रिया तसेच पोर्टलचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. शेतकऱ्यांसाठी क्यूआर कोडद्वारे बियाण्यांची सत्यता पडताळणी, थेट लाभ हस्तांतरण, तर विक्रेत्यांसाठी डिजिटल इन्व्हेंटरी व्यवस्थापन, परवाना नूतनीकरण व ई-बिल सुविधा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे बियाण्यांची ट्रेसेबिलिटी, गुणवत्ता नियंत्रण आणि बनावट बियाण्यांना आळा घालण्यासाठी 'साथी' पोर्टलचा प्रभावी वापर करण्याबाबत अधिकाऱ्यांना सविस्तर माहिती मिळाली. पोर्टलच्या वापरासंदर्भातील अडचणींसाठी संबंधित जिल्ह्यातील कृषी विकास अधिकारी व मोहीम अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

## साहित्य परिषदेचे ‘माधवराव पटवर्धन सभागृह' नवीन शुल्कासह उपलब्ध

पुणे (दै. संध्या)



मराठी रंगभूमी नव्याने नावारूपाला येत आहे. प्रेक्षक वर्गामध्ये वाढ होताना दिसून येते. या अनुषंगाने मराठी प्रेक्षकांच्या प्रेमाखातर महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने माधवराव पटवर्धन सभागृह टिळक रोड पुणे येथे चालू झाले आहे अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी प्रसिद्धीस दिली आहे. या सभागृहाची आसन क्षमता १२० असून ते वातानुकुलित आणि अद्ययावत तांत्रिक सोयींनी युक्त असे करण्यात आले आहे. हे सभागृह पुस्तक प्रकाशन, अभिवाचन, परिसंवाद, मुलाखती, काव्यवाचन, एकपात्री प्रयोग, पॉडकास्ट, व्याख्याने, कथाकथन, चर्चा सत्र, छोट्या परिषद, विविध संस्थांच्या वार्षिक सभा, शैक्षणिक विशेष व्याख्याने, सेमिनार्स, ऑडिशन्स आदी कार्यक्रमा साठी सशुल्क उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सभागृहासाठी बुधवार, (दि. १ जुलै) पासून नवीन शुल्क रचना करण्यात आली आहे. शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी तीन तासांसाठी ५ हजार रुपये, तसेच शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांचे दिवस सोडून इतर दिवशी तीन तासांसाठी ४ हजार रुपये आकारले जातील. शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्यांचे दिवस सोडून इतर दिवशी सकाळी ९ ते १२ किंवा १२ ते ३ या वेळात सभागृहाचे भाडे ३,५०० रुपये अशी विशेष सवलत देण्यात येणार आहे.

## ‘लोटस २ कर्णबधिर बालमहोत्सवा’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### हेलन केलर जयंतीनिमित्त शिक्षण, प्रेरणा आणि समावेशकतेचा अनोखा उत्सव

पुणे (दै. संध्या)



कर्णबधिर मुलांच्या शिक्षण, कला आणि सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणारा ‘लोटस २’ कर्णबधिर बालमहोत्सव नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ब्ली टेक इनोव्हेशन्स, असिस्टटेक फाउंडेशन आणि सीआयई इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात राज्यातील विविध कर्णबधिर शाळांमधील ३५० हून अधिक विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक आणि प्रशिक्षक सहभागी झाले.

कार्यक्रमाला पुणे महानगरपालिकेच्या विधी समितीच्या अध्यक्षा ॲड. स्वरदा बापट, ब्ली टेक इनोव्हेशन्सच्या संस्थापिका जान्हवी जोशी, सीआयई इंडियाचे प्रशांत शर्मा व पंकज गोयल, मांडके हिअरिंग सर्व्हिसेसच्या संस्थापिका डॉ. कल्याणी मांडके तसेच समाजकल्याण विभागाचे सहाय्यक निरीक्षक सागर सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जान्हवी जोशी यांनी सांगितले की," भारतीय सांकेतिक भाषा (ISL) माध्यमातून कर्णबधिर विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. राज्यातील ६० हून अधिक कर्णबधिर शाळांशी संस्थेचे नेटवर्क असून ३० पेक्षा अधिक हायब्रिड डिजिटल ग्रंथालये उभारण्यात आली आहेत. संस्थेच्या विविध उपक्रमांचा लाभ ५,००० हून अधिक विद्यार्थी आणि २०,००० पेक्षा अधिक कर्णबधिर व्यक्तींना झाला आहे." या उपक्रमासाठी सीएसआर अंतर्गत सहकार्य करणाऱ्या सीआयई इंडियाचे त्यांनी आभार मानले.

ॲड. स्वरदा बापट यांनी संस्थेच्या समावेशक शिक्षणासाठीच्या कार्याचे कौतुक करत भारतीय सांकेतिक भाषेतील अभ्यासक्रम, डिजिटल ग्रंथालये, कर्णबधिर प्रशिक्षकांमार्फत अध्यापन तसेच पालक व शिक्षक प्रशिक्षण यांसारखे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

महोत्सवात ‘श्रीकांत’ चित्रपटाचे भारतीय सांकेतिक भाषेतील (ISL) विशेष प्रदर्शन, कर्णबधिर विद्यार्थी व प्रशिक्षकांच्या नाटिका तसेच विविध सहभागात्मक उपक्रमांना उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हेलन केलर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या महोत्सवातून शिक्षण, स्वावलंबन, समान संधी आणि समावेशक समाजाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिकेत तामचिकर व उन्नती पारधी यांनी केले, तर दीप्ती देऊरूखकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## ‘चुडैल चली ससुराल’ – जादू, कॉमेडी आणि कौटुंबिक ड्रामाचा भन्नाट संगम

### या शोमध्ये प्रमुख भूमिकांमध्ये हिबा नवाब, राखी विजन आणि अधिक मेहता झळकणार आहेत

पुणे (दै. संध्या)



सोनी सब प्रेक्षकांना मोहून टाकण्यासाठी सज्ज आहे आपल्या आगामी कौटुंबिक सिटकॉम ‘चुडैल चली ससुराल’ सोबत जादू, कॉमेडी आणि हृदयस्पर्शी कौटुंबिक नात्यांचा आनंददायी संगम. चॅनेलच्या मनोरंजन परंपरेला खरं ठेवत, हा शो एक वेगळं पण ओळखीचं जग जिवंत करतो, जिथे जादू सहजपणे रोजच्या कौटुंबिक आयुष्यातील आनंद आणि गोंधळाशी मिसळते. प्रेमळ पात्रं, खळखळून हसवणारे क्षण आणि अनपेक्षित वळणांनी भरलेला चुडैल चली ससुराल संपूर्ण कुटुंबासाठी एक जादुई मनोरंजनाचा अनुभव देण्याचे वचन देतो.

कथेच्या मध्यभागी आहे उर्वशी (हिबा नवाब) एक दयाळू जादूगारणी जी आपल्या जादुई जगापेक्षा प्रेमाची निवड करते आणि आरव पटेल (अधिक मेहता) या प्रामाणिक, साधेपणावर विश्वास ठेवणाऱ्या आणि नात्यांच्या बळावर जगणाऱ्या व्यावसायिकासोबत नवे जीवन सुरू करते. मानवी घरातील लयीत स्वतःला जुळवून घेण्याचा प्रयत्न करताना उर्वशीला अगदी साध्या कामांमध्येही अनपेक्षित आणि मजेशीर प्रसंगांचा सामना करावा लागतो, जिथे थोडीशी जादू मोठा गोंधळ घडवते. या मजेत भर घालते कामिनी (राखी विजन) एक शक्तिशाली जादूगारणी जी जादूच सर्वोच्च आहे असे मानते आणि उर्वशीने जादूगारांच्या जगाला मागे सोडण्याचा निर्णय स्वीकारायला तयार नसते. त्यांच्या परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वांमुळे आणि जादू विरुद्ध साध्या कौटुंबिक आयुष्याच्या संघर्षामुळे हा शो हशा, भावना आणि गोंधळाने भरलेला एक संपूर्ण कौटुंबिक मनोरंजनाचा अनुभव देण्याचे वचन देतो.

लीड अभिनेत्री हिबा नवाब म्हणाली की, “जेव्हा मी ‘चुडैल चली ससुराल’ ची कथा ऐकली, तेव्हाच मला जाणवलं की हा शो प्रेक्षकांना खूप मजा देणार आहे. यात हशा, मजेशीर प्रसंग, जादूची धमाल आणि हृदयाला भिडणारे कौटुंबिक क्षण आहेत आणि या सगळ्याचा भाग होणं खूप मजेदार आहे. लोकांच्या चेहऱ्यावर हसू आणणं ही खूप मोठी समाधानाची गोष्ट आहे आणि हा शो ते सर्वात मनोरंजक पद्धतीने करतो. जवळपास 6 वर्षांनंतर सोनी सब वर परत येणं म्हणजे घरवापसीसारखं वाटतंय. या चॅनेलने नेहमीच कुटुंबांना एकत्र आणणाऱ्या कथा साजऱ्या केल्या आहेत आणि पुन्हा त्यांच्यासोबत काम करताना मला खूप आनंद होत आहे. प्रेक्षकांनी ही जादुई सफर अनुभवावी आणि आमच्यासोबत हसावं याची मला आतुरता आहे.”

तयार व्हा चुडैल चली ससुराल पाहण्यासाठी; लवकरच सोनी सबवर सुरू होत आहे.

## कर्जमुक्तीच्या घोषणेसह शेतकऱ्यांसाठी आणखी एक दिलासा

पुणे (दै. संध्या)

■ ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेचा पुणे जिल्ह्यात ५ हजार ६५४ शेतकऱ्यांना लाभ

राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीची घोषणा करत दिलासा दिला असून, त्याचबरोबर शेतीचा उत्पादन खर्च कमी करून शाश्वत शेतीला चालना देणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणीही सुरू ठेवली आहे. त्यापैकी ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ ही योजना पुणे जिल्ह्यात यशस्वी ठरत असून, आतापर्यंत ५ हजार ६५४ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा आणि मोफत वीज उपलब्ध होत असून सिंचन अधिक सुरक्षित, सुलभ आणि किफायतशीर झाले आहे. जिल्ह्यात आंबेगाव तालुक्यातील १८८, बारामती ६३५, भोर २३, दौंड ६५०, हवेली १८२, इंदापूर ७३८, जुन्नर ४२९, खेड २०१, मावळ १०, मुळशी २२, पुरंदर ५११, शिरूर १,९८४ आणि वेल्हा ११ अशा एकूण ५ हजार ६५४ शेतकऱ्यांना सौर कृषीपंपाचा लाभ मिळाला आहे. कर्जमुक्तीची घोषणा, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, सिंचन सुविधा, पीक विमा, बाजारपेठ उपलब्धता आणि सौर कृषीपंप यांसारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून त्यांचे उत्पन्न वाढविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शेती अधिक शाश्वत आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यावर भर देण्यात येत आहे. सौर कृषीपंपासाठी अनुसूचित जाती-जमातींच्या लाभार्थ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो, तर इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के हिस्सा भरून पंप उपलब्ध होतो.




## ॲमेझॉन प्राइम डे विक्रीला ४ जुलैपासून सुरुवात

### ॲमेझॉनकडून अनेक उपकरणांवर मोठी सवलत

पुणे (दै. संध्या)

ॲमेझॉन इंडियाने आपल्या वार्षिक 'प्राइम डे' विशेष विक्रीची घोषणा केली असून, यंदा या उपक्रमाचे दहावे वर्ष आहे. ४ ते ६ जुलैदरम्यान होणाऱ्या या विक्रीत प्राइम सदस्यांसाठी ॲलेक्सा-सक्षम ध्वनी उपकरणे, बुद्धिमान पडदे, फायर टीव्ही संच तसेच फायर टीव्ही प्रणाली अंगभूत असलेल्या दूरचित्रवाहिनी संचांवर ४५ टक्क्यांपर्यंत सवलतीची घोषणा करण्यात आली आहे. घरातील डिजिटल सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी तसेच मनोरंजनाचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी कंपनीने विविध उत्पादनांवर आकर्षक दर उपलब्ध करून दिले आहेत. नव्याने बाजारात दाखल झालेल्या 'इको डॉट मॅक्स', 'इको स्टुडिओ' आणि 'फायर टीव्ही स्टिक एचडी' यांसारख्या उत्पादनांचाही या सवलतीच्या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

ॲलेक्सा-सक्षम ध्वनी उपकरणांद्वारे केवळ आवाजाच्या आदेशांवर संगीत ऐकणे, स्मरणपत्रे तयार करणे, खरेदीची यादी बनवणे, हवामान, बातम्या आणि इतर माहिती मिळवणे तसेच घरातील सुसंगत विद्युत उपकरणांवर नियंत्रण ठेवणे शक्य होते. याशिवाय ॲमेझॉनवरील खरेदीसंदर्भातील माहिती, वस्तूंची नोंद करणे किंवा मागविलेल्या वस्तूंच्या वितरणाची स्थिती जाणून घेण्याची सुविधाही या उपकरणांद्वारे उपलब्ध आहे.

या विक्रीमध्ये इको मालिकेतील विविध उत्पादनांवर मोठी दरकपात करण्यात आली आहे. इको डॉट (पाचवी आवृत्ती) ३,९९९ रुपयांत, इको पॉप २,९४९ रुपयांत, इको (चौथी आवृत्ती) ५,००० रुपयांत, नवीन इको डॉट मॅक्स ८,९९९ रुपयांत, इको स्पॉट ६,९९९ रुपयांत, इको शो ८ हा १७,९९९ रुपयांत, इको शो ११ हा २४,४९९ रुपयांत, तर नवीन इको स्टुडिओ २१,४९९ रुपयांत उपलब्ध होणार आहे.

मनोरंजनासाठी वापरल्या जाणाऱ्या फायर टीव्ही उपकरणांवरही आकर्षक सवलत देण्यात आली आहे.

साध्या दूरचित्रवाहिनी संचाला आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे किंवा विद्यमान दूरचित्रवाहिनी संच अधिक वेगवान आणि सक्षम बनविण्यासाठी ही उपकरणे उपयुक्त ठरतात. विविध चित्रपट, मालिका, दृकश्राव्य कार्यक्रम तसेच खेळांचा अनुभव या उपकरणांद्वारे अधिक प्रभावीपणे घेता येतो. नवीन फायर टीव्ही स्टिक एचडीवर ४५ टक्के सवलत देत त्याची किंमत २,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. तसेच फायर टीव्ही स्टिक ४के प्लस ४,४९९ रुपयांत, फायर टीव्ही स्टिक ४के सिलेक्ट ३,४९९ रुपयांत आणि फायर टीव्ही क्यूब १२,९९९ रुपयांत उपलब्ध होणार आहे. याशिवाय फायर टीव्ही प्रणाली अंगभूत असलेल्या निवडक दूरचित्रवाहिनी संचांवर ५५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार असल्याचे कंपनीने सांगितले आहे.

### देशभरातील प्रेक्षकांकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने

# ‘अब होगा हिसाब’ सीझन २ चा ट्रेलर प्रदर्शित

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ देशभरातील प्रेक्षकांकडून मिळालेल्या भरभरून प्रेमामुळे आणि उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ‘अब होगा हिसाब’ अपेक्षेपेक्षाही लवकर दुसऱ्या सीझनसह परतत आहे




भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने 'अब होगा हिसाब' या त्यांच्या ओरिजिनल रिव्हेंज ड्रामा सीरिजच्या दुसऱ्या सीझनचा ट्रेलर आज प्रदर्शित केला आहे. पहिल्या सीझनला प्रेक्षकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर हा ट्रेलर सादर करण्यात आला आहे. 18 जून रोजी प्रीमियर झाल्यापासून या सीरिजने आपल्या उत्कंठावर्धक कथानक आणि प्रभावी अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला असून या सीरिजला मोठ्या प्रमाणावर पसंती मिळाली आहे. या उत्साहवर्धक प्रतिसादाच्या जोरावर ॲमेझॉन एमएक्स प्लेअर ही सीरिज अपेक्षेपेक्षाही लवकर दुसऱ्या सीझनसह प्रेक्षकांच्या भेटीला आणत आहे. अरे स्टुडिओची निर्मिती असलेला ‘अब होगा हिसाब’ सीझन 2 हा 3 जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे.

दुसऱ्या सीझनचा ट्रेलर पहिल्या सीझनचा शेवट जिथे झाला होता, तिथूनच सीझन 2 सुरू होतो. या सीझनमध्ये बॉबीने बंटीचा शोध घेण्याचा ध्यास घेतला आहे. यातील बॉबीची व्यक्तिरेखा शाहीरने तर बंटीची व्यक्तिरेखा अविनाश मिश्राने साकारली आहे. सत्य समोर आणण्यासाठी तो यापूर्वीपेक्षाही अधिक पुढचे पाऊल टाकण्यास तयार आहे. त्याच्या या शोध घेण्याच्या प्रवासात तो गोल्डीच्या (संजय कपूर यांनी साकरलेली व्यक्तिरेखा) जगात जातो. गोल्डी हा अत्यंत प्रभावशाली आणि सहज कोणालाही आपल्या जवळ न येऊ देणारा माणूस आहे. त्याच्यापर्यंत पोहोचणे वाटते तितके सोपे नसते. गोल्डी सहज कोणावरही विश्वास ठेवत नसल्यामुळे बॉबीला त्याचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रत्येक पाऊल सावधपणे टाकावे लागते. जसजसा बॉबी त्याच्या जवळ पोहोचू लागतो, तसतशी अनेक गुपिते समोर येऊ लागतात आणि नात्यांमधील तडे दिसू लागतात. गोल्डीचा बॉबीवरील विश्वास डळमळीत होऊ लागतो आणि एका अस्वस्थ युतीची जागा संशय, फसवणूक आणि संघर्षाच्या धोकादायक खेळाने घेतली जाते.

संजय कपूर आणि शाहीर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सीरिजमध्ये मौनी रॉय, अविनाश मिश्रा, निम्रत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि आशीमा वर्दान हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. दुसरा सीझन अधिक गुंतागुंतीचे कथानक, अधिक मोठी आव्हाने आणि प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी अनपेक्षित वळणे घेऊन येणार आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे डायरेक्टर आणि कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, “‘अब होगा हिसाब’ला मिळालेला प्रतिसाद खरोखरच मनाला स्पर्श करणारा आहे. प्रेक्षक या सीरिजच्या कथाविश्वाशी इतक्या मोठ्या प्रमाणावर जोडले गेलेले पाहणे, आमच्यासाठी आणि या सीरिजशी संबंधित प्रत्येकासाठी अत्यंत समाधानकारक आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये आम्ही भारताच्या मातीत रुजलेल्या आणि देशभरातील प्रेक्षकांशी जोडल्या जाणाऱ्या कथा मोफत स्वरूपात सादर करण्यासाठी कटिबद्ध आहोत. या सीरिजला मिळालेले प्रेम हे आमच्या त्या दृष्टिकोनाची साक्ष आहे. आता दुसऱ्या सीझनसह हा प्रवास पुढे सुरू ठेवण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.” बॉबी मनोचा ही व्यक्तिरेखा साकारणारा शाहीर म्हणाला, “‘अब होगा हिसाब’या सीरिजवर प्रेक्षकांनी भरभरून केलेल्या प्रेमामुळे मी खरोखर भारावून गेलो आहे. आमच्या अपेक्षेपेक्षाही लवकर दुसरा सीझन घेऊन येण्याची संधी दिल्याबद्दल मी ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचा आभारी आहे. या कथेला प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमाचे आणि आपुलकीचे हे थेट फलित आहे. दुसऱ्या सीझनमध्ये बॉबीची अस्वस्थता यापूर्वी कधीही न पाहिलेल्या पातळीवर पोहोचली आहे. बंटीचा शोध घेण्यासाठी तो कोणत्याही थराला जाण्यास तयार आहे, मग त्यासाठी धोकादायक जगात पाऊल ठेवावे लागले किंवा आपल्या नियंत्रणाबाहेर जाऊ शकणारा खेळ खेळावा लागला तरीही. ट्रेलरमध्ये तो किती पुढे जाणार आहे आणि या प्रवासात त्याला किती मोठी किंमत मोजावी लागू शकते, याची केवळ एक झलक पाहायला मिळते.”

## एचडीएफसी बँकेच्या अध्यक्षपदी राजीव कुमार

मुंबई (दै. संध्या) : एचडीएफसी बँकेने माजी वित्तीय सेवा सचिव राजीव कुमार यांची अंशकालीन बिगर कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत या नियुक्तीला मंजुरी दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीनंतर तसेच भागधारकांच्या संमतीनंतर ही नियुक्ती प्रभावी होणार आहे.राजीव कुमार यांची जून २०२६ पासून चार वर्षांच्या कालावधीसाठी अतिरिक्त (स्वतंत्र) संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी अंशकालीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती होणार असून ती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीच्या अधीन असेल.

## गुणवत्ता सुधारली

पुणे (दै. संध्या) : रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या ताज्या वित्तीय स्थैर्य अहवालानुसार देशातील नागरी सहकारी बँकांची मालमत्ता गुणवत्ता सुधारली असून, भांडवल पर्याप्तता देखील मजबूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरी सहकारी बँकांची आर्थिक सक्षमता अधोरेखित करणाऱ्या या अहवालामुळे सहकारी बँकिंग क्षेत्राबद्दलचा सर्वसामान्यांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, असे मत बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात दोनशे रुग्णांवर इसीटीपद्धतीने उपचार

बारामती (दै. संध्या) :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील मानसोपचार विभागामध्ये माहे जानेवारी २०२४ पासून ते जून २०२६ या कालावधीत इलेक्ट्रो कॉनव्हलसिव्ह थेरपीद्वारे (ईसीटी) दोनशे रुग्णांवर यशस्वीरित्या उपचार करण्यात आले आहेत, अशी माहिती उपअधिष्ठाता व प्राध्यापक व विभाग प्रमुख भूलशास्त्र डॉ. प्रज्ञा भालेराव यांनी दिली आहे. ईसीटी ही तीव्र स्वरूपाच्या मानसिक आजारांवर प्रभावी ठरणारी उपचारपद्धती आहे. या आधुनिक मॉडिफाइड ईसीटीमध्ये रुग्णाला प्रथम अल्पकालिन भूल देण्यात येते. त्यामुळे उपचारादरम्यान कोणताही त्रास किंवा वेदना जाणवत नाहीत. या उपचारामुळे आत्महत्येची प्रवृत्ती, तीव्र नैराश्य, आक्रमक वर्तन यामध्ये त्वरित सुधारणा होण्यास मदत होते. स्किझोफ्रेनिया, बायपोलार डिसऑर्डर, तीव्र नैराश्य (डिप्रेशन), सायकोसिस यांसारख्या गंभीर मानसिक आजारांच्या उपचारामध्ये ईसीटीचा प्रभावी वापर केला जातो. अत्याधुनिक आणि सुरक्षित पद्धतीने दिल्या जाणाऱ्या या उपचारामुळे गंभीर मानसिक आजारांवरील उपचार अधिक परिणामकारक ठरत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी सांगितले. योग्य वैद्यकीय तपासणी, भूलतज्ज्ञांची उपस्थिती आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली दिली जाणारी उपचारपद्धती अत्यंत सुरक्षित आहे. मानसिक आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांनी स्वतःहून निर्णय न घेता प्रथम मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.शासकीय दरामध्ये ईसीटीद्वारे उपचार होत असल्याने परिसरातील रुग्णांना या थेरपीचा लाभ होत असून रुग्णांसाठी वरदान ठरत आहेत. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित सर्वोपचार रुग्णालयात येथे उपचार घेवून मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ. भालेराव यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

## पद्म पुरस्कार-२०२७ साठी पात्र व्यक्तींची नावे सुचविण्याचे आवाहन

भिवंडी (दै. संध्या) :

ठाणे जिल्ह्यातील नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना कळविण्यात येते की, समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व असामान्य योगदान दिलेल्या व्यक्तींची पद्म पुरस्कार - २०२७ साठी नावे सुचविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

कला, समाजकार्य, सार्वजनिक जीवन, विज्ञान व तंत्रज्ञान, व्यापार व उद्योग, वैद्यकीय सेवा, साहित्य व शिक्षण, उत्कृष्ट प्रशासकीय सेवा, क्रीडा व योगा, तसेच भारतीय संस्कृती, मानवी हक्क, वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन इत्यादी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची नावे सुचविता येतील. इच्छुक नागरिकांनी किंवा संस्थांनी संबंधित व्यक्तीच्या कार्याचा संक्षिप्त परिचय व आवश्यक माहिती/कागदपत्रांसह नामांकन प्रस्ताव संबंधित तहसील कार्यालयामार्फत अथवा थेट जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे यांच्याकडे विहित मुदतीत सादर करावा (१५ जुलै २०२६ पर्यंत).

अधिकाधिक पात्र व्यक्तींची नावे पुढे यावीत, यासाठी सर्व नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी ठाणे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा

पुणे (दै. संध्या) :

■ जिल्ह्यातील एकूण 16 प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित कृषी दिन कार्यक्रमात जिल्ह्यातील एकूण 16 प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती अमोल नलावडे, समाज कल्याण समिती सभापती जितेंद्र बडेकर, सार्वजनिक बांधकाम व आरोग्य समिती सभापती दिपाली हुलावळे, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, सदस्य दिपाली गव्हाणे, रुपाली झेंडे, शीतल कांबळे, कृषी आयुक्तालयाचे विभागीय कृषी सहसंचालक संभाजी ठाकूर, जिल्हा कृषी अधिकारी अजित पिसाळ, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. राजेंद्र वासनिक, कृषी उपसंचालक रोहन भोसले शेतकरी, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळाचे प्रशिक्षक हेमंत जगताप, कृषी व पशुसखी उपस्थित होते.

श्री. नलावडे म्हणाले, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या लोकाभिमुख कामांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जिल्हा परिषदेच्यावतीने काम करण्यात येत आहे. जिल्ह्यातील अंगणवाडी प्रकल्प, शाळांमध्ये कृषी दिन साजरा करण्यात आला आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्ह्यात डॉक्टर आपल्या दारी उपक्रम राबविण्यात येत असून लाखो शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत आहे. उमेद अभियानाअंतर्गत जिल्ह्यात महिला बचत गटांना सुमारे 500 कोटी रुपयांच्या निधींचे वाटप करण्यात आले आहे. संकट काळात बळीराजाच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहण्याकरिता कृषी कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्यावतीने काम करण्यात येईल, या कार्यक्रमात करण्यात आलेल्या सूचनांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असेही श्री. नलावडे म्हणाले.

श्री. बडेकर म्हणाले, राज्याच्या जडणघडणीत शेतकऱ्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांना आधार देण्याकरिता त्यामुळे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्यावतीने जिल्ह्यात काम करण्यात येत आहे. कृषी क्षेत्रात विविध योजना व नाविन्यपूर्ण उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. येत्या काळात राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांना कृषी भूषण पुरस्कार देण्याची सूचना यावेळी श्री. बडेकर यांनी केली.

श्री. काकडे म्हणाले, एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंवर्धनाच्यादृष्टीने हवेली तालुक्यात जलतारा प्रकल्पाची योजना राबविण्यात येत आहे. नाशिक येथील सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनीच्या धर्तीवर जिल्ह्यात कंपनी स्थापन करण्याकरिता पुढाकार घ्यावा, असेही श्री. काकडे म्हणाले.

श्री. ठाकूर म्हणाले, एल निनोच्या वर्षात कृषी विभागाच्यावतीने वेळोवळी पीकनिहाय मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच कृषी विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेतीपुरक व्यवसाय करण्यावर भर द्यावा, असे आवाहन श्री. ठाकूर यांनी केले.


डॉ. वासनिक म्हणाले, पशुसंवर्धन विभागाला आता कृषीचा दर्जा प्राप्त झालेला आहे. पशुसंवर्धन विभागाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन करत जिल्ह्यात कृषी पर्यटन सुरु करण्याबाबत पुढाकार घ्यावा, अशी सूचना डॉ. वासनिक यांनी केली.

श्री.जगताप म्हणाले, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळाच्या संरक्षित शेती विषयावर शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येत आहे. हे प्रशिक्षणाचा रोजगार वाढीकरिता उपयुक्त असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. जगताप यांनी केले.

श्रीमती गव्हाणे यांनी सदस्यांच्यावतीने प्रातिनिधिक स्वरुपात आपले विचार व्यक्त केले. तसेच कार्यक्रमात प्रातिनिधीक स्वरुपात शेतकऱ्यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. रोहन भोसले तर उपस्थितांचे आभार श्री. कदम यांनी मानले. सुत्रसंचालन आशिष जराड यांनी केले.

## शिक्षकांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा



भिवंडी (दै. संध्या) : मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या वतीने, अध्यक्ष प्रा. डॉ. विशाल कडणे यांच्या संकल्पनेतून शिक्षकांच्या पाल्यांच्या शैक्षणिक, क्रीडा व इतर उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी "शिक्षकांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा – २०२६" आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे संपन्न होणार आहे.


महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा**

कार्यकारी अभियंता, महावितरण, पुणे नगर रोड विभाग, पुणे महावितरणमध्ये नोंदणीकृत नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांकडून निविदा क्र. (EE/NRD/T-02/2026-27 ) साठी दुरुस्तीपत्रक व मुदतवाढ करण्यात येत आहे. निविदा दस्तऐवज विक्रीसाठी अंतिम तारीख दिनांक ०७.०७.२०२६, दुपारी ३ वाजेपर्यंत व निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक ०७.०७.२०२६, रात्री २३:५५ वाजेपर्यंत असून वरील ई निविदा महावितरणच्या http://www. mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता
(नगर रोड विभाग) पुणे

PRO No.PZ/066 / 2026-27



**ग्रामपंचायत कार्यालय सुराळे ता. जुन्नर, जि. पुणे.**

**ग्रामपंचायत शिपाई कर्मचारी पदभरती**

**२०२६ जाहिरात नोटीस**

मौजे. सुराळे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामस्थ यांना कळविण्यात येत आहे कि, मौजे. सुराळे ग्रामपंचायतीकडे शिपाई कर्मचारी (जागा १) या पदाची भरती करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१ अर्जदार सुराळे ग्रामपंचायत हद्दीतील स्थानिक रहिवाशी असावा.
२) अर्जदाराचे वय खुला वर्ग १८ वर्ष ते ३३ वर्ष आणि मागासवर्गीय वर्ग १८ वर्ष ते ३८ वर्ष
३) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा १० वी किंवा ७ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक
४) उच्च पदवी अहर्ता धारकास प्राधान्य देणेत येईल.
५) अर्जदार एम एस सी आय टी संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य देणेत येईल.
६) आय टी आय इलेक्ट्रिकल मोटार रिवायंडिंग व मेकॅनिकल डिप्लोमा धारकास प्राधान्य दिले जाईल
७) जास्त अर्ज प्राप्त झाल्यास परीक्षेद्वारे निवड करण्यात येईल.
८) उमेदवाराने अर्जासोबत अनुभव दाखला असल्यास साक्षांकित प्रती जोडावा.
९) निवडी बाबत सर्व अधिकार हा ग्रामपंचायत कार्यकारी मंडळाचा राहील.
१०) नेमणूकी नंतर अटी व शर्ती मान्य करून त्याचे पालन केले पाहिजे.
११) रु.१०० च्या स्टंप पेपर वर प्रतिज्ञापत्र मी प्रमाणित करतो कि अर्जात सादर केलेली माहती खरी आहे ती खोटी अथवा चुकीची असलेचे आढळून आल्यास मला अपात्र समजून माझ्यावर कारवाई केल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही.
१२) प्राप्त अर्जाची छाननी व अर्जाची निवड प्रक्रिया यासाठीचे सर्व अधिकार मासिक सभेस असतील.
१३) पात्र उमेदवारास मासिक सभेत ठराव करून नेमणुकीचा आदेश देण्यात येईल.

तरी इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज कार्यालयीन वेळेत व रीत प्रमाणे शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेसह ग्रामपंचायतीकडे दिनांक २०/०७/२०२६ पर्यंत सादर करावेत.

**टीप** :- १) उशिरा आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही. २) अर्जाचा नमुना ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

**स्थळ : ग्रामपंचायत कार्यालय सुराळे**

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत सुराळे, त. जुन्नर, जि.पुणे.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषत गांव मौजे खानापूर, ता. जुन्नर जि.पुणे येथील लोकांस, या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत गांव मौजे खानापूर येथील खाते क्र. १३७६ वरील जमीन गट/सर्वे नं. ३८१ पैकी चे विद्यमान मालक १) श्री. सिद्धेश विजय ढोले, २) श्री. अभिजीत मनोज आहेर दोघेही रा. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. यांचे सामाईकातील खरेदी मालकीची जमीन मिळकत असून, सदरची विद्यमान मालकांची असलेली एकूण जमीन मिळकत ही श्री. शांताराम गजानन पिंपळे, रा. कल्याणपेठ जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे यांनी खरेदीखत करण्याचे ठरविलेले आहे.

खालील परिशिष्ट मध्ये नमुद मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेबाबत भरोसा व अशी हमी खरेदीदार यांना वर नमूद केलेले जमिन मिळकतीचे विदयमान मालक यांनी दिलेला आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, अधिकार, दावा, ताबा म्हणजेच गहाण, दान, लीज, लिन, बक्षिस, खरेदी-विक्री, साठेखत, चोळी, बांगडी, वाटप, पोटगी, रस्ता, वहीवाट, कुळ, इतर वारसा हक्क इत्यादी स्वरुपाचे अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार तसेच हित संबंध अथवा इतर कोणताही मालकी हक्क नाही, असे आमचे अशिलास खात्रीलायक सांगितलेले आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आमचे अशिलाचे पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्या निशी संपर्क साधावा व तशी खात्री करुन दयावी अन्यथा सदरची मिळकत निर्वेध निजोखीम आहे असे समजुन सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही व असल्यास त्यानी तो जाणीव पूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे पोट तुकडी जुन्नर ता. जुन्नर, तसेच मे. दुय्यम निबंधक सो.जुन्नर, यांचे हद्दीतील गांव मौजे खानापूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते क्र. १३७६ वरील शेतजमीन मिळकत.

| गट/सर्वे नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| १) ३८१ पैकी. | ०.२०.०० | ००.४१ |
| | पो.ख. ०.०३.५९ | |

या पैकी ०० हे. ११.०५ आर + पो.ख. ०० हे. १.५० आर एकूण क्षेत्र ०० हे. १३ आर, यासी आकार ० रू. २१ पैसे.

यांसी चतुः सिमा रेकॉर्डस ऑफ राईटस् प्रमाणे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस

जुन्नर,
ता. ०१/०७/२०२६.

अँड. नंदकुमार मोतीराम चौधरी,
एम्. कॉम. एल. एल. बी.
अँडव्होकेट व नोटरी
नेहरू बाजार जुन्नर ता.जुन्नर जि.पुणे
मो..नं.९९७०३४०७६५


# झी टीव्हीने भारतातील पुढील सिंगिंग सुपरस्टारच्या शोधाला केली सुरुवात

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ ‘सा रे ग म प’च्या ऑडिशन तारखांची घोषणा




झी टीव्हीने बहुप्रतीक्षित ‘सा रे ग म प’च्या नव्या सीझनचा पहिला प्रोमो सादर केला असून भारतातील पुढील सिंगिंग सुपरस्टारच्या शोधाची सुरुवात झाली आहे. देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या नैसर्गिक आणि खऱ्या संगीताची परंपरा ह्या शो च्या ह्या सीझनमध्येही कायम ठेवण्यात आली आहे. या प्रोमोमध्ये एका नवजात बाळाच्या स्वागताचा आनंददायी कौटुंबिक सोहळा दाखवण्यात आला असून त्यात जन्म आणि नव्या सुरुवातींचा उत्सव साजरा करणाऱ्या उत्तर प्रदेश आणि बिहारमधील पारंपरिक ‘सोहर’ लोकगीताचे भावपूर्ण सादरीकरण करण्यात आले आहे. समृद्ध भारतीय सांस्कृतिक परंपरेशी जोडलेला हा शो खऱ्या आणि अस्सल संगीताचा उत्सव साजरा करत विविध पिढ्यांना एकत्र आणण्याची ताकद दर्शवतो. ‘सा रे ग म प’ हा शो भव्य मंच, आकर्षक निर्मिती मूल्ये आणि 100 हून अधिक लाईव्ह संगीतकार, गायक आणि वादक यांच्या सहभागासह परत येत असून यावेळी प्रेक्षकांना यापूर्वी कधीही न अनुभवलेला अविस्मरणीय संगीताचा अनुभव देण्यासाठी सज्ज आहे.

ऑडिशनला सुरुवात करत झी टीव्हीने देशातील प्रमुख शहरांमध्ये पहिल्या टप्प्यातील तारखांची घोषणा केली आहे. इच्छुक गायक 3 जुलै रोजी वाराणसी, 4 जुलै रोजी लखनौ आणि 5 जुलै रोजी दिल्ली येथे ऑडिशन देऊ शकतात. इतर शहरांतील ऑडिशनच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार आहेत.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ ‘सा रे ग म प’ हा शो भारतातील उत्कृष्ट संगीत प्रतिभेसाठी एक महत्त्वाचा मंच ठरला आहे. श्रेया घोषाल, कुणाल गांजावाला, मोनाली ठाकूर यांसारख्या अनेक नामांकित गायकांच्या कारकिर्दीला या शोने दिशा दिली आहे.

आगामी सीझनमध्ये या समृद्ध परंपरेला पुढे नेण्याचा उद्देश असून येथे प्रत्येक नवोदित कलाकाराच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीचा आणि अस्सलतेचा उत्सव साजरा केला जाणार आहे. ह्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धक +91 9152915218 या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन नोंदणी करू शकतात. त्यानंतर त्यांना एसएमएसद्वारे ऑडिशन वेबसाईटची अधिकृत लिंक मिळेल. तसेच +91 8655780787 या व्हॉट्सअॅप क्रमांकावर आवश्यक माहिती आणि दोन ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स पाठवूनही ऑडिशन देता येईल. याशिवाय, अधिकृत ऑडिशन पोर्टलवरही थेट आपली एन्ट्री सबमिट करता येईल.

देशातील पुढील म्युझिकल सेंसेशनच्या शोधाला सुरुवात होत असताना, इच्छुक गायकांना त्यांच्या स्वप्नांना वास्तवात उतरवण्यासाठी पहिले पाऊल उचलण्याचे आमंत्रण देण्यात येत आहे. ‘सा रे ग म प’ लवकरच परत येत आहे, फक्त झी टीव्हीवर!

3 जुलै — वाराणसी:
ग्रीन व्हॅली इंग्लिश स्कूल, लेन क्रमांक 16, खुशाल नगर रोड, नातिनीदयी मंदिराजवळ, सेक्टर ए, बडा लालपूर, लम्ही, वाराणसी, उत्तर प्रदेश – 221002

4 जुलै — लखनौ:
सेंट्रल अकॅडमी सीनियर सेकंडरी स्कूल, वनस्थली पार्क, 4/3, खजाना मार्केट चौक, सेक्टर के1 ब्लॉक, आशियाना, लखनौ, उत्तर प्रदेश – 226012

5 जुलै — दिल्ली:
सेंट्रल अकॅडमी इंटरनॅशनल स्कूल, 7, रोड क्रमांक 203, मेट्रो लाईनसमोर, सेक्टर 10, द्वारका, नवी दिल्ली – 110075
गेट्स सकाळी 8 वाजता उघडतील.


**पुणे महानगरपालिका, पुणे**

निविदा प्रक्रिया कक्ष
फेर निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. ०१/०७/२०२६ ते ०८/०७/२०२६ दु. २.३० पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ०१/०७/२०२६ ते ०८/०७/२०२६ दु. २.३० पर्यंत
टेंडर नोटीस
जाहिरात क्रमांक : २/२९७ दि. ०१/०७/२०२६
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ०९/०७/२०२६ ०३:०० वाजता

| निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव/संपुर्ण तपशील | निविदा संच किंमत र. रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | अडचण आल्यास निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/103 | पाणीपुरवठा विभाग | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २६ मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती कामे करणे करिता मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ५९९८५२१/- | रू. ६०,०००/- | १२ | श्री. केतन जाधव ९९७०१३८२३१ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
स्वारगेट पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ज्येष्ठ सभासदांचे वाढदिवस संघातर्फे साजरे

निगडी (दैनिक संध्या) : संत तुकाराम हास्ययोग परिवार सेक्टर २७ अ,येथे दरवर्षी दर तीन तीन महिन्यांनी सभासदांचे वाढदिवस तसेच स्नेहभोजन आयोजित केले जाते. यावेळी दीप प्रज्वलन,गणेश वंदना नंतर सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले.यात एप्रिल ते जून पर्यंत ६० ज्येष्ठांचा सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात आली.संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.गुणवंत चिखलीकर (पशुवैद्यकीय अधिकारी)यांनी ९१ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांनी त्याचे मित्रमंडळी व स्नेही तसेच सलीम शिकलगार यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला.तसेच या सर्वांनी डॉ. गुणवंत चिखलीकर यांचा सत्कार केला.संघाचे अध्यक्ष श्री.दलिचंद शिंगवी यांनी डॉ. गुणवंत चिखलीकर यांचा सत्कार केला.७५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या सौ.मधुरा देवकर,सौ. आशा नष्टे,सौ. रोहिणी आडकर,श्रीमती मंदाकिनी पवार,सौ. वत्सला वाघचौरे,यांचा सत्कार करण्यात आला. आपली दिनचर्या यावर सुंदर हस्ताक्षर स्पर्धा यामध्ये सौ.अलका म्हेत्रे, श्रीमती मिनल वैद्य,श्रीमती कुंदा कोळपकर यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले.याचे परीक्षण सौ.साधना सपाटे, श्रीमती विमल कुचेकर,व श्री. बाळासाहेब साळुंखे यांनी केले. त्याचे प्रायोजक श्री,दलिचंद शिंगवी,श्री.रामचंद्र डुंबरे व श्री. दिलीप गोसावी होते. आवर्जून उपस्थित राहिलेले प्रा.ज्ये. नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी यांनी डॉ. गुणवंत चिखलीकर यांचा सत्कार केला तसेच त्यांच्यातर्फेही त्यांचा सत्कार करण्यात आला.आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी प्रा.ज्ये. नागरिक संघात यावर्षीपासून ८१ तसेच ९१ व्या वर्षात पदार्पण केलेल्या सर्व ज्येष्ठांचे सत्कार करण्यात येतील असे जाहीर केले.वाढदिवस समिती प्रमुख श्रीमती कुंदा कोळपकर व अलका कणखर यांनी सूत्रसंचालन केले.श्री नरेंद्र मिसाळ यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला कार्यकारिणी व वाढदिवस समिती या सर्वांचे सहकार्य लाभले.



### हरेश नखाते यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा शिंदेच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबई येथील निवासस्थानी हरेश आबा नखाते व सुजाता हरेश नखाते यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत, मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे तसेच माजी खासदार आनंद परांजपे आदी उपस्थित होते. पक्षप्रवेशाच्या वेळी विभागप्रमुख गोरख पाटील, अमोल राठोड, एकनाथ मंजाळ, संभाजी नढे, काटे मामा, बाळासाहेब येडे, महादेव बिक्कड, कृष्णा येळवे, राम खमीतकर, सुधीर दुधमल, प्रजाक नढे, सुभाष काजारी, रोहित नखाते, लक्ष्मण टोणपे, मनीषा येडे, मनोज जगताप, अर्जुन गोरगेल आणि हर्षल धाकतोडे यांनीही शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. हरेश नखाते व सुजाता नखाते यांच्या या पक्षप्रवेशामुळे परिसरातील शिवसेना संघटनेला बळ मिळणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### तिजोऱ्या फोडल्याच, ठेवीही मोडल्या; उधळपट्टीत चढाओढ, 'श्रीमंती'ला ग्रहण..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिका ही महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक संपन्न अशा महापालिकांपैकी एक मानली जात होती. हजारो कोटी रुपयांचा राखीव निधी, हे या 'श्रीमंत' पालिकेचे वैशिष्ट्य होते. मात्र, ती संपन्नता आणि त्या श्रीमंतीचा रूबाब आता राहिला नाही. गेल्या काही वर्षांत पिंपरी चिंचवड महापालिकेला भ्रष्ट कारभाराचे ग्रहण लागले आहे. पालिकेच्या तिजोरीवर संगनमताने वारंवार दरोडे टाकण्यात आले. विकासकामांच्या गोंडस नावाखाली वारेमाप उधळपट्टीचा सपाटाच लावण्यात आला. हे कमी होते म्हणून की काय, आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून राखून ठेवलेल्या कोट्यवधी रूपयांच्या ठेवी सतत मोडल्या जाऊ लागल्या. अशा अनागोंदीमुळे, भ्रष्ट आणि नियोजनशून्य कारभारामुळे पिंपरी पालिकेच्या 'श्रीमंती'ला तडे गेले असून भिकेचे डोहाळे लागले आहेत. पाणीयोजनेसाठी पिंपरी पालिकेकडून ५५० कोटी रूपयांच्या ठेवी मोडण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे ठेवींच्या अर्थकारणाची चर्चा पुन्हा ऐरणीवर आली. ठेवी मोडण्याची पिंपरी पालिकेची ही पहिलीच वेळ नाही. 'कोणते ना कोणते' कारण पुढे करून यापूर्वी अनेकदा ठेवी मोडण्याचा नाकर्तेपणा पालिकेने दाखवला आहे. पालिकेच्या कथित 'श्रीमंती'मुळे आतापर्यंत तो विषय फारसा चर्चिला जात नव्हता. मात्र, प्रशासकीय काळात 'अति तेथे माती' झाल्याने आणि प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, विजय खोराटे यांच्या अंदाधुंद कारभारामुळे पालिकेची पुरेपूर वाट लागली, तिजोरीत खडखडाट झाला, तेव्हा सगळ्यांचे डोळे खाडकन उघडले. पिंपरी पालिकेला मिळणाऱ्या उत्पन्नांचे स्त्रोत मर्यादित असतानाही सातत्याने उधळपट्टी होत राहिली. पालिका कर्जबाजारी झाली. ठोस नियोजन नसताना ढीगभर प्रकल्प सुरू करण्यात आले, त्यासाठी पैसे नाहीत म्हणून कोट्यवधींच्या ठेवी मोडाव्या लागल्या. त्यानंतर ठेवी मोडण्याचा पायंडाच पडला, तो अजूनही कायम आहे. महापालिकेने 'हरित कर्ज' म्हणून २०० कोटींचे रोखे काढले आहेत. 'मनपा कर्जरोखे' म्हणून २०० कोटी रूपये काढले आहेत, जागतिक बँकेकडून १६० कोटी रूपये कर्ज घेतले आहेत. सर्व मिळून ४६० कोटी रूपयांचे कर्ज काढले, त्यापैकी कर्जाची काही रक्कम फेडण्यात आली असली तरी, ३३७ कोटींचे कर्जाची परतफेड बाकी आहे.




# आनंद जेष्ठ नागरिक संघाची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**वाकड (दै. संध्या)**

आनंद ज्येष्ठ नागरिक संघ, पोस्टल कॉलनी वाकड संघाची 13 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 28 जून 2026 रोजी सकाळी हॉटेल बर्ड व्हॅली च्या भव्य सभागृहात संपन्न झाली.

सभेला मा. स्वातीताई मयूर कलाटे, (मा. नगरसेविका पिंपरी चिंचवड महानगरपालिका ), मा. वृषालीताई मरळ, (अध्यक्षा ज्येष्ठ नागरिक महासंघ पिंपरी चिंचवड शहर), हे मान्यवर उपस्थित होते. इतर संघांचे अध्यक्ष व पदाधिकारी देखील हजर होते. सभेला 230 ते 240 सभासद हजर होते.

संघाचे अध्यक्ष श्री भागवत कोल्हे यांनी आलेल्या सर्वांचे स्वागत केले .संघातील निधन झालेल्या सभासदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. मान्यवर व संघाचे पदाधिकारी यांच्यामार्फत दीप प्रज्वलन करण्यात आले . कला मंच मधील महिलानी गणेश वंदन शारदा स्तवन व स्वागत गीत सादर केले.

मान्यवरांचे सत्कार करण्यात आले मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. माननीय स्वातीताई कलाटे यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, "आनंद ज्येष्ठ नागरिक संघाची वाटचाल खूप चांगल्या पद्धतीने चालू आहे. अनेक प्रकारचे उपक्रम होतात. या संघामध्ये महिलांची संख्या जास्त आहे. महिलांचे अनेक कार्यक्रम घेतले जातात. यांच्या यशस्वी वाटचालीसाठी माझ्याकडून शुभेच्छा." माननीय वृषाली मरळ आपल्या भाषणात सांगितले की, " संघाला विरंगुळा केंद्र नाही .तेव्हा विरंगुळा केंद्र मिळण्यासाठी मी प्रयत्न करेन. "



वय वर्ष 75 असणाऱ्या सभासदांचा यथोचित सत्कार करण्यात आला.त्यामध्ये मुरलीधर लहाने ,श्रीकांत रेवणवार,मनोहर चौधरी ,भास्कर आगलावे, शिवाजी सिद्धांति ,निवृत्ती पाटील ,अरुण काळे ,शशिकला पेडणेकर ,शालिनी नारखेडे, मंजू पटवर्धन, पारूबाई पवार, देवयानी जोशी व मीरा बोरकर. यांचा सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे काही विशेष सत्कार करण्यात आले .त्यामध्ये ज्ञानेश्वर गिरमे, रेखा गिरमे ,माधव बराटे ,यांचा योग गुरु म्हणून सत्कार करण्यात आले.तसेच आंतरराष्ट्रीय खुराश इन्स्टिट्यूट मध्ये तज्ञ म्हणून निवड झालेले डॉक्टर संतोष तेली, युरोपियन पातळीवर जुडोमध्ये ब्रांच पदक मिळवणाऱ्या शिल्पा तेली आणि भारतातील त्वचेवर काम करणारे सर्वोच्च संस्था मध्ये डॉक्टर नंदिनी तेली( त्वचारोग तज्ञ) यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. माननीय मयूर भाऊ पांडुरंग कलाटे मा.नगरसेवक(पिंपरी चिंचवडमहानगरपालिका) संघाचे आधार स्तंभ असल्यामुळेच संघ यशस्वी वाटचाल करत आहे.

त्यानंतर सभेपुढे येणारे विषय घेण्यात आले, शेवटी आभार प्रदर्शन व पसायदान झाल्यानंतर सर्व सभासदांना जेवण देण्यात आले व त्यानंतरच सभा विसर्जित करण्यात आले. सभेच्या नियोजन व कार्यामध्ये संघाचे उपाध्यक्ष मुरलीधर लहाने, संघाचे सचिव सुरेश बोरकर, सहसचिव आप्पासाहेब तेली व खजिनदार माधव बराटे यांनी परिश्रम घेतले. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गिरमे यांनी केले. महिला मंडळ व त्यांच्या अध्यक्ष सौ कळमकर तसेच श्री कुलकर्णी व देसाई यांचेही सहकार्य मिळाले

या सभेला "आदर्श सभा" अशा प्रकारचा सन्मान उपस्थित प्रेक्षकांकडून मिळाला.

## महापालिका सेवेतून जून अखेर ५७ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

**पिंपरी (दै. संध्या)**

महानगरपालिकेच्या विविध विभागांत प्रदीर्घ काळ प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने सेवा बजावत सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महापालिकेच्या जडणघडणीत तसेच शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे,त्यांच्या या उल्लेखनीय सेवाकार्याबद्दल महापालिकेच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी त्यांचा सत्कार करत त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सन्मान समारंभात जून २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे ४२ तसेच स्वेच्छा सेवानिवृत्ती स्वीकारलेले १५ अशा एकूण ५७ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




या कार्यक्रमास कामगार कल्याण विभागाचे सहायक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कर्मचारी महासंघाचे उमेश बांदल, नंदकुमार इंदलकर, विविध विभागांतील कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. जून २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये कार्यकारी अभियंता सुदर्शन वहीकर, उपअभियंता विद्युत श्यामसुंदर बनसोडे, प्रशासन अधिकारी जयवंत निरगुडे, असिस्टंट मेट्रन प्रतिभा नाईकरे, मुख्याध्यापक निर्मला खुडे, सायराबानू शिकलगार, सुनंदा कोंडे, विजया ढमाले, आशा निचळ, बाळुबाई माळी, स्नेहला मोरे, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) अनिल झोडे, शामसुंदर भंडारी, उपशिक्षक मीना पवार, रफियासुल्ताना सय्यद, अय्याज मोमीन, विजया भूतकर, संगीता पाटील, आरोग्य निरीक्षक राजेंद्र उजिनवाल, फिटर पद्माकर सावंत, वायरमन रोहिदास गोळे, वॉर्ड बॉय तानाजी दुदुस्कर, हनुमंत सोनवणे, रखवालदार दामू मुठे, हंबीर बवले, राजेंद्र पवार, शिपाई पंडीत साखरे, मजूर शंकर देवकर, बाळासाहेब कढू, सुरेश फुगे, सुनिल बहिरट, रामदास जाधव, रामअवध गोड, शंकर नवरंग, रमाकांत सुर्वे, संजय असवलीकर, मधुकर सुतार, नाईक बाळा पवार, स्प्रे कुली पांडुरंग डामसे, सफाई कामगार संभाजी गोरखे, मृणालिनी रणपिसे तसेच गटरकुली मल्हारी अवतारे यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई कामगार मंतोष जगताप, रविंद्र शिंदे, पारुवाई बचुटे, अलका खेंग्रे, मुनिता जाधव, लता कंडारा, लक्ष्मी घोडेस्वार, मुदलीयार मोतीराम, निशा नेटके, अनिता बनसोडे , सुनिता साळवे, स्प्रे कुली दत्तात्रय बालघरे, सफाई सेवक प्रभाकर वाघमारे आणि गटरकुली दाजी करवंदे, रमेश हेंद्रे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तानाजी नरळे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी आणि आभार मुख्य लिपिक माया वाकडे यांनी मानले.

## 'डेअरी फार्म' रेल्वे उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात; ऋषिकेश वाघेरेंकडून कामाची पाहणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढणाऱ्या 'डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपुलाच्या' कामाने आता अत्यंत निर्णायक टप्पा गाठला आहे. अनेक वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळाली असून रेल्वे मार्गावरील सर्वात महत्त्वाचे व आव्हानात्मक असणारे स्टील गर्डर बसविण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. हा उड्डाणपूल पिंपरीगाव व बाजारपेठ परिसरासह संपूर्ण शहरासाठी "माईलस्टोन' रणार असल्याचा विश्वास युवा नेते ऋषिकेश संजोग वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून सुमारे १,२९० मीटर लांबीच्या या भव्य उड्डाणपुलाच्या प्रत्यक्ष कामाला सन २०२३ मध्ये सुरुवात झाली होती. मात्र, सुरुवातीच्या काळात वृक्षतोड, विविध विभागांच्या तांत्रिक परवानग्या, संरक्षण विभागाची जागा आणि रेल्वे प्रशासनाची मंजुरी मिळवण्याची प्रक्रिया यामुळे या कामात अनेक कायदेशीर व तांत्रिक अडथळे आले. परिणामी प्रकल्पाला काहीसा विलंब झाला. मात्र, महापालिकेने या सर्व अडचणींवर यशस्वीपणे मात करत आता प्रकल्प पूर्णत्वाकडे नेला आहे. या उड्डाणपुलाच्या उभारणीतील सर्वात तांत्रिक आणि जटिल भाग म्हणजे रेल्वे क्रॉसिंगवरील स्टील गर्डर बसवणे हा होता. हे काम अत्यंत सुरक्षिततेने पार पाडण्यासाठी महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाच्या संयुक्त समन्वयाने विशेष 'मेगा ब्लॉक' घेतले जात आहेत. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने दररोज हे अवजड गर्डर निश्चित जागेवर बसवून त्यांची जोडणी (लाँचिंग) करण्याचे काम सुरू आहे. गर्डर बसवण्याचे काम पूर्ण होताच, त्यावर स्लॅब टाकणे, डांबरीकरण करणे आणि अंतिम फिनिशिंगची कामे तातडीने हाती घेऊन ती जलदगतीने पूर्ण केली जाणार आहेत.

## विश्वविजेती रौप्यपदक विजेती कु. शौर्या दिलीप भरणे हिचा नगरसेविका स्नेहा कलाटे यांच्या हस्ते सत्कार

**वाकड (दै. संध्या)**

जर्मनी येथे पार पडलेल्या ज्युनिअर वर्ल्ड शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताला रौप्यपदक मिळवून देत जागतिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणारी मुळशी तालुक्यातील माण गावची कन्या व विश्वविजेती नेमबाज कु. शौर्या दिलीप भरणे हिचा नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे व रणजित कलाटे यांच्या हस्ते प्रभू श्रीराम दरबाराचे पवित्र स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी शौर्या भरणे हिच्या कुटुंबीयांचीही सदिच्छा भेट घेण्यात आली.

यावेळी बोलताना नगरसेविका स्नेहा कलाटे यांनी सांगितले की, "शौर्याने आपल्या जिद्द, शिस्त, अथक परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर जागतिक स्पर्धेत भारताचा तिरंगा अभिमानाने फडकावला आहे.



तिच्या या यशामुळे महाराष्ट्रासह मुळशी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिची ही कामगिरी राज्यातील आणि देशातील युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे." महान महाराष्ट्र केसरी पैलवान दिलीपभाऊ भरणे यांच्या कन्या असलेल्या शौर्याने आपल्या उत्कृष्ट कामगिरीतून क्रीडासंस्कार, सातत्यपूर्ण मेहनत आणि कुटुंबाच्या भक्कम पाठबळामुळे कोणतेही ध्येय गाठता येते, हे सिद्ध करून दाखवले आहे. दिलीपभाऊ भरणे यांनी आपल्या कन्येतील प्रतिभेला योग्य दिशा व प्रोत्साहन दिल्यामुळे आज तिच्या रूपाने भारताला जागतिक स्तरावर अभिमानास्पद यश मिळाले आहे.

यावेळी नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांनी कु. शौर्या दिलीप भरणे हिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, भविष्यातही सुवर्णपदक पटकावून भारत, महाराष्ट्र आणि मुळशी तालुक्याचा गौरव अधिक उंचावावा, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

## पक्ष विरोधी भूमिका घेणाऱ्या नगरसेवकांवर कारवाई होणार – सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भाजपच्या नगरसेवकांमध्ये पक्षशिस्तीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पक्षाच्या अधिकृत भूमिकेविरोधात भूमिका घेणाऱ्या नगरसेवकांवर पक्षांतर्गत कारवाई केली जाईल, अशी माहिती सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली.

प्रशांत शितोळे म्हणाले, भाजपच्या कोअर कमिटी बैठकीत पक्षशिस्तीच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली. काही नगरसेवकांकडून पक्षाच्या अधिकृत भूमिकेपासून विचलित होत स्वतंत्र भूमिका घेतली जात असल्याबाबत वरिष्ठ नेतृत्वाने तीव्र नाराजी व्यक्त केली. यापुढे अशा प्रकाराला कोणतीही मुभा दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पक्षाची भूमिका एकच असावी, प्रत्येक नगरसेवकाने पक्षाच्या निर्णयानुसारच मतदान आणि भूमिका मांडावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. पदाधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या विरोधात जाणे, सभागृहात वेगळी भूमिका घेणे किंवा माध्यमांसमोर पक्षाच्या भूमिकेशी विसंगत वक्तव्य करणे हे पक्षशिस्तीचे उल्लंघन मानले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

पक्षशिस्त मोडणाऱ्या नगरसेवकांवर कारवाई केली जाईल. गरज पडल्यास संबंधितांची पक्षश्रेष्ठींकडे तक्रार पाठविणे, पदांवरील जबाबदाऱ्या काढून घेणे तसेच पक्षाच्या नियमांनुसार पुढील शिस्तभंगाची कारवाई करण्याचाही इशारा देण्यात आला. पक्षात समन्वय, शिस्त आणि एकसंघ भूमिका राखणे अत्यंत आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले.

# 'दापोडी ते निगडी' रस्त्याचे 'कै. खा.अण्णासाहेब मगर हमरस्ता' असे नामकरण!

**पिंपरी (दै. संध्या)**

आज आपण जे वैभवशाली शहर पाहत आहोत, त्या शहराच्या विकासाचे स्वप्न माजी नगराध्यक्ष अण्णासाहेब मगर यांच्या दूरदृष्टीतून साकारले आहे.त्यांच्या कार्याची आठवण म्हणून महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे नाव दापोडी ते निगडी अशा रस्त्यास देण्यात आले असून त्यामुळे पुढील पिढ्यांना त्यांच्या व्यापक कार्याची ओळख होईल असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी-चिंचवड नगरीचे शिल्पकार, माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या नुकत्याच झालेल्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करत, दापोडी ते निगडी या मुख्य रस्त्याचे 'कै. खासदार अण्णासाहेब मगर हमरस्ता' असे दापोडी येथील नामकरण फलकाचे अनावरण पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते संपन्न झाले,त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शहर सुधार समितीचे सभापती संजय काटे, नगरसदस्य ॲड.नितीन लांडगे, राजू बनसोडे, नगरसदस्या माई काटे, प्रतीक्षा जवळकर, श्रुती वाकडकर, ज्येष्ठ इतिहासकार डॉ. राजा दीक्षित,सह शहर अभियंता मनोज सेठीया, बापू गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता संजय काशिद, उप अभियंता संतोष कुदळे,



जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, तसेच डॉ. सीमा काळभोर तसेच विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाला बोलताना महापौर रवि लांडगे यांनी "अण्णासाहेबांकडे नगराध्यक्ष आणि आमदार पदाची जबाबदारी होती. हडपसरवरून पिंपरी-चिंचवड आणि तिथून थेट मुंबई आणि परत हडपसर असा खडतर प्रवास अनेकदा करून अतिशय कष्टातून त्यांनी या शहराच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली. त्याकाळी त्यांनी मुख्य १०० मीटर रुंद रस्त्यांचे केलेले नियोजन आणि औद्योगिक क्षेत्राचे केलेले नियोजन आज या शहराचा पाया ठरले आहे," असे महापौर लांडगे यांनी सांगितले. तर सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी एका कार्यक्रमात नगरीचे शिल्पकार माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या कार्याचा उल्लेख करत अभिवादन शहरातील मुख्य रस्त्यास त्यांचे नाव देण्याची संकल्पना मांडली होती.

## दिव्यांग परिस्थितीवर मात करत प्रसाद गायकवाड पदवी परिक्षा उत्तीर्ण

**भिवरी (दै. संध्या)**



शारीरिक अडचणींवर मात करत जिद्द,चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर दिव्यांग तरुण प्रसाद अनुरुद्र गायकवाड याने पदवी परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करून प्रेरणादायी यश संपादन केले आहे.प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

पुरंदर तालुक्यातील भिवरी येथील जन्मतः दिव्यांग असलेला प्रसाद याचे शिक्षण भिवरी गावातच झाले.यानंतर बहि:स्थ विद्यार्थी म्हणून त्याने बारावी परीक्षा चांगल्या पद्धतीने उत्तीर्ण झाला. प्रसादने शिक्षणाच्या प्रवासात अनेक अडथळ्यांना सामोरे जात हार न मानता सातत्याने अभ्यास केला. त्याच्या मेहनतीचे फळ म्हणून त्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे कला शाखेची पदवी परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली.आता त्याचे लक्ष्य स्पर्धा परीक्षांची तयारी करून प्रशासकीय सेवेत अधिकारी बनण्याचे आहे.

परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते," असा विश्वास प्रसाद व्यक्त याने व्यक्त केला.पुढील काळात स्पर्धा परीक्षांचा सखोल अभ्यास करून समाजासाठी काम करणारा अधिकारी बनण्याचा त्याचा निर्धार आहे.

प्रसाद गायकवाड याच्या यशामुळे अनेक दिव्यांग तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे. त्याच्या जिद्दीला आणि ध्येयवेड्या वृत्तीला सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात असून भविष्यात तो मोठे यश संपादन करेल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

> दिव्यांग असल्याचे शल्य न बाळगता मी पहिल्या पासून अभ्यास केला. मला स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी बनुन सर्वसामान्य यांची कामे करायची आहेत.
> **- प्रसाद गायकवाड, दिव्यांग पदवीधर**

# करिअर डेने उजळले समर्थ आयटीआयच्या विद्यार्थ्यांचे भविष्य

### २८ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड : टोयोटा टेक्निकल एज्युकेशन प्रोग्रामचा मोठा यशस्वी टप्पा; ग्रामीण विद्यार्थ्यांना रोजगाराची सुवर्णसंधी

**जुन्नर (दै. संध्या)**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशाची नवी दिशा देणाऱ्या समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ आयटीआय, बेल्हे येथे आयोजित करण्यात आलेला करिअर डे विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी ठरला. गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, अत्याधुनिक तांत्रिक ज्ञान आणि उद्योगाभिमुख कौशल्य विकासाच्या बळावर तब्बल २८ विद्यार्थ्यांची नामांकित टोयोटा डीलरशिपमध्ये निवड झाल्याने संस्थेच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

समर्थ आयटीआय आणि टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ऑटोमोटिव्ह बॉडी रिपेअर (डेंटिंग) आणि ऑटोमोटिव्ह पेंट रिपेअर (पेंटिंग) या एक वर्षाच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना आधुनिक वाहन दुरुस्ती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. तांत्रिक शिक्षण विभाग आणि दिल्ली सरकारच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या या अभ्यासक्रमात अत्याधुनिक प्रशिक्षण उपकरणे, स्प्रे पेंटिंग साधने तसेच उद्योगातील अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्याबरोबरच आत्मविश्वास आणि उद्योगक्षेत्रासाठी आवश्यक व्यावसायिक क्षमता विकसित होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना कुशल, सक्षम आणि रोजगारक्षम बनविणे हेच संस्थेचे ध्येय असल्याचे संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी सांगितले.

या करिअर डेच्या माध्यमातून २८ विद्यार्थ्यांची विविध टोयोटा डीलरशिपमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य पांडुरंग हाडवळे यांनी दिली. विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण आदित्य दिघे यांनी दिले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर तसेच उपप्राचार्य विष्णू मापारी यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी, "गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांच्या त्रिवेणी संगमातून समर्थ आयटीआयचे विद्यार्थी उद्योगविश्वात आत्मविश्वासाने झेपावत असून, ग्रामीण भागातील युवकांसाठी समर्थ आयटीआय यशाचा विश्वासार्ह मार्ग ठरत आहे," अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

आवश्यक असल्यास यासाठी आकर्षक मुखपृष्ठ मथळा, सोशल मीडिया पोस्ट किंवा वृत्तपत्र लेआउटसाठी संक्षिप्त आवृत्ती देखील तयार करून देऊ शकतो.

**निवड झालेले विद्यार्थी**

शॉ टोयोटा – ऑटोमोटिव्ह बॉडी रिपेअर (डेंटिंग) :
अविष्कार आहेर, साहिल चासकर, किरण चापुडे, अनिकेत डोके, गणेश डुंबरे, अनिकेत गोपाळे, देवदत्त इचके, प्रथमेश जाधव, सुजल कदम, सार्थक कोरडे, अजिंक्य लामखडे, शंतनू नायकोडी, प्रतीक तुपे.
शरयू टोयोटा – ऑटोमोटिव्ह बॉडी रिपेअर :
आलिम पठाण, आविष्कार साळुंखे.
शॉ टोयोटा – ऑटोमोटिव्ह पेंट रिपेअर :
मयुरेश जगताप, विवेक रोकडे, शंतनू विधाटे, जहिद शेख.
शरयू टोयोटा – ऑटोमोटिव्ह पेंट रिपेअर :
निखिल भांगरे, अजय काकडे, अजय माने, प्रथमेश मोरडे, ऋग्वेद नलावडे, शंकर सप्रे, सुमित हांडे, अविष्कार पोखरकर.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ऑलिम्पिकमध्ये प्रतिनिधित्वचे स्वप्न पाहणाऱ्या कुस्तीपटूंना आलिया भट्टची भेट

बारामती (दैनिक संध्या) : अल्फाच्या प्रदर्शनापूर्वी आलिया भट्टने पुण्यातील जोग महाराज व्यायामशाळेला भेट देत ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवा महिला कुस्तीपटूंशी प्रेरणादायी संवाद साधला. आलियाने या नामांकित प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन कुस्तीपटूंची कठोर सराव सत्रे आणि मैत्रीपूर्ण कुस्ती सामने पाहिले. यावेळी तिला या खेळाडूंची शिस्त, मेहनत, चिकाटी आणि क्रीडाप्रती असलेले समर्पण जवळून अनुभवता आले. तिने युवा महिला कुस्तीपटूंशी संवाद साधत त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा उंचावण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. ही भेट जिद्द, संघर्ष, चिकाटी आणि मोठी स्वप्ने पाहण्याच्या वृत्तीचा गौरव करणारी ठरली. हेच मूल्य 'अल्फा' आणि त्याच्या मुख्य पात्राच्या प्रवासाशीही घट्ट जोडलेले आहेत. आदित्य चोप्रा निर्मित आणि शिव रावैल दिग्दर्शित 'अल्फा'मध्ये आलिया भट्ट आणि शरवरी प्रमुख भूमिकेत असून हा चित्रपट येत्या शुक्रवारी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये.



## भिगवण ग्रामीण रुग्णालयात रोटरी क्लबच्या वतीने 'डॉक्टर्स डे' उत्साहात साजरा

भिगवण (दैनिक संध्या) : समाजातील प्रत्येक घटकाचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या डॉक्टरांचे योगदान अमूल्य आहे. याच कृतज्ञता भावनेतून रोटरी क्लबच्या वतीने येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये १ जुलै रोजी 'राष्ट्रीय डॉक्टर दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. विभूते व कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला व त्यांच्या आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कोरोना काळापासून ते आजतागायत ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांना तत्पर आणि दर्जेदार सेवा देणाऱ्या भिगवण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, सर्व डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य सेवक-सेविकांचा रोटरी क्लबच्या वतीने पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना रोटरीचे अध्यक्ष प्रवीण वाघ म्हणाले की, "डॉक्टर हे समाजाचे रक्षक आहेत. स्वतःच्या सुखाची, वेळेची पर्वा न करता रुग्णांचे प्राण वाचवणे हेच त्यांचे ध्येय असते. ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये मर्यादा असूनही येथील डॉक्टर देत असलेली सेवा कौतुकास्पद आहे." या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रविण वाघ,सचिव डॉ. प्रशांत चवरे, खजिनदार संजय चौधरी, माजी अध्यक्ष रियाज शेख, संतोष सवाने,औदुंबर हुलगे, सर्व सन्माननीय सदस्य व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विभूते, नितीन परकाळे, परिचारिका, औषध निर्माता व कर्मचारी उपस्थित होते.

## 60 वर्षांनंतर डोळ्यात उजेड! नेत्रदानामुळे 63 वर्षीय महिलेची यशस्वी नेत्ररोपण शस्त्रक्रिया

नारायणगाव (दैनिक संध्या) : बालपणापासूनच डाव्या डोळ्याला अंधत्व आलेल्या ओतूर येथील वंदना खंडू डुंबरे( वय-६३ ) या ज्येष्ठ महिलेच्या डोळ्याची नेत्ररोपण शस्त्रक्रिया येथील पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनच्या गॅलेक्सी आय हॉस्पिटल रुग्णालयात करण्यात आली. नेत्ररोपणामुळे मागील सुमारे साठ वर्षाचे अंधत्व दूर झाल्याने वंदना डुंबरे यांनी रुग्णालय प्रशासनाचे व मरणोतर नेत्रदान करणाऱ्या युवकाचे आभार मानले आहेत. डाव्या डोळयाच्या बुबुळावर पांढऱ्या रेषा व टिक पडल्याने बालपणात वंदना डुंबरे यांना अंधत्व आले होते. डाव्या डोळ्याचे अंधत्व दूर करण्यासाठी त्यांनी अनेक नेत्र तज्ज्ञांकडून उपचार करून घेतले. मात्र या समस्येपासून त्यांची सुटका झाली नाही. यामुळे वयाच्या 63 वर्षापर्यंत त्यांनी उजव्या डोळ्यानेच आपल्या आयुष्याचा खडतर प्रवास केला. वाढत्या वयाबरोबरच रक्तदाब, मधुमेह व संधिवात आदि आजार सुरू झाले.

## महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त कुदळेवाडीत जंत निर्मूलन शिबिर



**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित्य साधून "डॉक्टर आपल्या दारी" या योजनेअंतर्गत पशुवैद्यकीय चिकित्सालय, जेजुरी यांच्या वतीने ग्रामपंचायत कोळविहिरे अंतर्गत कुदळेवाडी येथे जंत निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये परिसरातील पशुपालक, गोपालक व दुग्ध व्यवसायिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.यावेळी दीडशे जनावरांना औषधांचे वाटप करण्यात आले. यावेळी पशुपालक व दुग्ध व्यवसायिकांना शासनाच्या "मुख्यमंत्री ग्रामीण उद्योजकता" योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच योजनेबाबतची माहितीपत्रके वाटप करून लाभार्थींना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. शिबिरामध्ये 150 जनावरांच्या प्राथमिक उपचारांसाठी आवश्यक औषधे व जंत निर्मूलन औषधांचे वाटप करण्यात आले.

## ज्ञानसागरच्या विद्यार्थ्यांची दिल्लीच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेड साठी निवड

**सावळ (दै. संध्या)**



श्रेयश जाधव | श्रुती गाडे | अभिलाषा अष्टेकर

दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या (Republic Day) प्रतिष्ठित आरडीसी (RDC) परेडसाठी बारामती तालुक्यातील 'ज्ञानसागर गुरुकुल' च्या तीन होनहार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. शाळेसाठी,पालकांसाठी आणि संपूर्ण परिसरासाठी ही अत्यंत अभिमानाची,गौरवाची आणि आनंदाची बाब ठरली आहे.श्रेयस सचिन जाधव,श्रुती प्रकाश गाडे आणि अभिलाषा नीलकंठ अष्टेकर अशी या गुणवंत विद्यार्थ्यांची नावे आहेत.

प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील राजपथावर होणारी परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम हा संपूर्ण देशाच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो.या राष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यात सहभागी होण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थी पाहतात.यंदा हे स्वप्न ज्ञानसागर गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक मेजर बाबुराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली साकार केले आहे.

या विद्यार्थ्यांपैकी श्रेयस सचिन जाधव याने आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या आणि शिस्तीच्या जोरावर दिल्लीतील सर्वोत्कृष्ट परेडसाठी (Best Parade) आपली जागा निश्चित केली आहे. तर,श्रुती प्रकाश गाडे आणि अभिलाषा नीलकंठ अष्टेकर या दोघींची प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केल्या जाणाऱ्या शानदार सांस्कृतिक कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली आहे.देशाच्या राजधानीत आपल्या शाळेचे आणि राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची मोठी संधी या विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या संधीमुळे विद्यार्थ्यांच्या कष्टाचे आणि गुरुकुलने दिलेल्या संस्कारांचे फळ मिळाले असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.ज्ञानसागर गुरुकुलच्या या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे सर्वत्र त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सागर आटोळे यांनी व शाळेचे व्यवस्थापन,शिक्षक वर्ग आणि पालकांनी या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून,त्यांच्या दिल्लीतील दिमाखदार सादरीकरणासाठी त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

## कर्तृत्व, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीचा गौरव; अरविंद जगताप यांचा सेवापूर्ती सन्मान

**बारामती (दै. संध्या)**



बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव अरविंद संपतराव जगताप यांच्या २६ वर्षांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवे बदद्ल बारामती बाजार समिती आयोजित सेवापूर्ती गौरव सोहळा मंगळवार दि. ३० जुन २०२६ रोजी मुख्य बाजार आवारातील नवीन रेशीम मार्केट इमारत येथे उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन व अजितदादांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक सुनील पवार यांनी केले तर सूर्यकांत मोरे यांनी सचिव पदी केलेल्या सेवाकाळाचा आढावा घेऊन यांच्या प्रामाणिक, तत्परता, पारदर्शक कामाचे कौतुक करून शिस्तबद्ध प्रशासनाची माहिती दिली. श्री. शरद भोसले यांनी सचिव अरविंद जगताप यांच्या कार्याचा प्रेरणादायी लघुचित्रफीत सादर केली, यावेळी बाजार समितीच्या विकासासाठी उपबाजार आवार व पेट्रोल पंपासाठी जागा उपलब्ध करून देणे, सीएनजी पंप उभारणी, बारामती, जळोची , सुपे व झारगडवाडी येथे नवीन जागा संपादन, बाजार समितीचा विस्तार, आधुनिक सुविधा उभारणी, ग्रेडींग मशिन, मॅग्नेट प्रकल्प, जळोची येथे नवीन ऑफिस इमारत, रयतभवन येथे शेतकरी मॉल उभारणी, व्यापारी व कर्मशिअल गाळे बांधून भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे आदी विकासकामांत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद करण्यात आले.

स्व. अजितदादा पवार साहेब व आदरणीय पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पवार कुटुंबीयांच्या सहकार्याने अरविंद जगताप यांनी बाजार समितीला नवे वैभव प्राप्त करून दिले. आज बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची देशातील आदर्श बाजार समिती म्हणून झालेली ओळख ही त्यांच्या कार्याची पावती असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात संभाजीनाना होळकर यांनी अरविंद जगताप यांच्या कार्याचा गौरव करताना, विविध विकासकामांसाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करून निधी उपलब्ध करण्यात त्यांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. पवार कुटुंबाच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ, शाल देऊन अरविंद जगताप यांचा सत्कार करण्यात आला. उपसभापती अरुण सकट यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संभाजीनाना होळकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बारामती पंचायत समितीचे सभापती किरण तावरे,मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष संभाजी किर्वे,फळे-भाजीपाला आडतदार संघटनेचे अध्यक्ष सईद बागवान,बाजार समितीचे सभापती विनायक गावडे,उपसभापती अरुण सकट,माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे संचालक योगेश जगताप,नगरसेवक सुरज सातव यांच्यासह बाजार समितीचे माजी सभापती रमेश गोफणे,विठ्ठलराव देवकाते, संजय काटे,ज्ञानदेव कदम अनिल हिवरकर,धनवान वदक, गोरख चौलंग,अशोकराव मुळीक आणि उपसभापती लक्ष्मणराव मोरे, कुंदन देवकाते,अशोकराव खैरे,सौ. छाया जमदाडे,सौ.अलका जगताप, सौ.उषाताई भोंडवे,संध्याताई बोबडे तसेच सुर्यकांत गादिया,शरद भिंगे, बाळासाहेब फराटे,अमोल वाडीकर, शंकर सरक,दादासो मोरे आणि आजी-माजी पदाधिकारी,संचालक, शेतकरी,व्यापारी,हमाल मापाडी आणि बाजार समितीचे सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयुष्मान व आभा कार्ड वाटप शिबिरात ९२० कार्ड वाटप



**नारायणगाव (दै. संध्या)**

**नारायणगाव जैन संघ व गौतमलब्धी फाउंडेशन नारायणगाव यांचा उपक्रम**

नारायणगाव जैन संघ व गौतमलब्धी फाउंडेशन नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंतप्रधान जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान कार्ड व आभा कार्ड वाटप शिबिरात ९२० कार्ड वाटप करण्यात आल्याची माहिती आयोजक अतुल कांकरिया, मनोज भळगट व अशोक खिंवसरा यांनी दिली नारायणगाव येथील महावीर भवन येथे विशेष आरोग्य सुरक्षा कवच शिबिराचे आयोजन महावीर भवन येथे करण्यात आले होते. देशभरातील हजारो हॉस्पिटलमध्ये कॅशलेस उपचार देणारे ५ लाखांपर्यंत मोफत उपचार आयुष्मान कार्ड शिबिरासाठी गौतम लब्धी कमिटी पुणे विभाग यांच्या माध्यमातून सीएससी सेंटर शिवाजीनगर पुणेचे संचालक गौतम नाबरिया, शिवम हंबीर, तेजस मांढरे, प्रथमेश वडघुले, ओम गाढवे, जैन संघाचे अध्यक्ष विलास भळगट, सचिव अतुल कांकरिया, सर्व विश्वस्त पदाधिकारी गौतम लब्धी नारायणगाव कमिटी संचालक मनोज भळगट, अशोक खिवसंरा आदींनी नियोजन केले होते.

# १,८६४ कोटींची गुंतवणूक भारताच्या गृहनिर्माण क्षेत्रावरील विश्वासाचे द्योतक

**उरण (दै. संध्या)**

फिडेलिटी इन्व्हेस्टमेंट्सने लोधा डेव्हलपर्समध्ये सुमारे 2% हिस्सा अंदाजे ₹1,864 कोटी (US$200 दशलक्ष) मध्ये विकत घेतल्याने, लोधा तसेच भारताच्या निवासी रिअल इस्टेट बाजाराच्या दीर्घकालीन क्षमतेवरील महत्त्वपूर्ण विश्वास अधोरेखित झाला आहे. दीर्घकालीन आणि संशोधनाधारित गुंतवणूक दृष्टिकोनासाठी जागतिक स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या फिडेलिटीने लोधामध्ये केलेली ही मोठी गुंतवणूक कंपनीचे बाजारातील नेतृत्व, वाढीचा प्रवास आणि दीर्घकालीन भागधारक मूल्य निर्माण करण्याच्या क्षमतेवरील विश्वास दर्शवते.





फिडेलिटी, जी जागतिक स्तरावर US$5 ट्रिलियनहून अधिक मालमत्ता व्यवस्थापित करते, ही जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थात्मक गुंतवणूकदारांपैकी एक मानली जाते. विशेष म्हणजे, ही गुंतवणूक अशा वेळी झाली आहे जेव्हा परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर निव्वळ विक्रेते राहिले आहेत. अशा पार्श्वभूमीवर, फिडेलिटीने लोधामध्ये महत्त्वपूर्ण हिस्सा उभारण्याचा निर्णय घेतला, जो कंपनी तसेच भारताच्या गृहनिर्माण क्षेत्रावरील ठाम विश्वासाचे प्रतीक आहे.

लोधासाठी ही गुंतवणूक भारतातील अग्रगण्य निवासी रिअल इस्टेट विकासक म्हणून त्यांची स्थिती अधिक मजबूत करते. सूचीबद्ध झाल्यापासून कंपनीने आर्थिक तसेच कार्यात्मक पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. FY26 मध्ये लोधाने ₹205.3 अब्ज इतकी विक्रमी प्री-सेल्स नोंदवली, जी सूचीबद्ध झाल्यापासूनच्या पाच वर्षांच्या कालावधीत 28% CAGR दर्शवते. त्याच कालावधीत, FY21 च्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा सहापटपेक्षा अधिक वाढून ₹34.3 अब्जांपेक्षा जास्त झाला आहे. कंपनीने आपला ताळेबंद देखील लक्षणीयरीत्या मजबूत केला असून, सूचीबद्धतेच्या वेळी असलेले 3.5x निव्वळ कर्ज-ते-इक्विटी प्रमाण कमी करून ते 0.23x वर आणले आहे. याशिवाय, कंपनीकडे जवळपास ₹2 ट्रिलियन इतक्या विक्री न झालेल्या एकूण विकास मूल्याचा (Gross Development Value) प्रकल्पांचा साठा असून, त्यामुळे भविष्यातील वाढीसाठी मजबूत दृश्यमानता उपलब्ध झाली आहे.

कंपनीशी संबंधित घटकांव्यतिरिक्त, फिडेलिटीची ही गुंतवणूक भारताच्या निवासी बाजारपेठेत निर्माण होत असलेल्या संरचनात्मक संधीवरही प्रकाश टाकते. वाढते उत्पन्न, वाढते शहरीकरण, प्रीमियमायझेशनचे ट्रेंड आणि संघटित विकासकांकडे होत असलेले सातत्यपूर्ण स्थलांतर या घटकांमुळे या क्षेत्राचा कायापालट होत आहे. भारतातील रिअल इस्टेट उद्योगासाठी हा व्यवहार केवळ भांडवली बाजारातील एक घटना नाही. भारतीय गृहनिर्माण क्षेत्राच्या दीर्घकालीन मागणीच्या कहाणीवर तसेच त्या संधीतील महत्त्वपूर्ण वाटा मिळवण्याच्या लोधाच्या क्षमतेवर जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित संस्थेने व्यक्त केलेला हा ठाम विश्वास आहे.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' उपक्रम

■ मुंबई (दै. संध्या)

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.




वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील. आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

### चरणसेवा म्हणजे काय?

संत तुकाराम महाराजांनी "तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा" या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

# इंडियन REITs असोसिएशनच्या अध्यक्षपदी शिरीष गोडबोले

■ मुंबई (दै. संध्या)

भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (REIT) क्षेत्राच्या सर्वोच्च उद्योग संघटनेच्या अध्यक्षपदी मराठी चेहरा विराजमान झाला आहे. नॉलेज रिॲल्टी ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) शिरीष गोडबोले यांची इंडियन REITs असोसिएशन (IRA) च्या अध्यक्षपदी तत्काळ प्रभावाने नियुक्ती करण्यात आली आहे. ब्रुकफिल्ड इंडिया रिअल इस्टेट ट्रस्टचे माजी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक अग्रवाल यांच्या निवृत्तीनंतर गोडबोले यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. SEBI आणि केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली २०२३ मध्ये स्थापन झालेली इंडियन REITs असोसिएशन ही भारतातील REIT क्षेत्राच्या विकासासाठी कार्य करणारी प्रमुख उद्योग संघटना आहे. या संघटनेत देशातील सर्व प्रमुख सूचीबद्ध REITs सदस्य आहेत. गोडबोले यांनी नियुक्तीनंतर REIT क्षेत्राला अधिक सक्षम करणे, गुंतवणूकदारांमध्ये जागरूकता वाढवणे, सर्वोच्च दर्जाचे सुशासन आणि पारदर्शकता कायम राखणे, तसेच उद्योगाच्या पुढील विकासाला चालना देण्याची भूमिका स्पष्ट केली. भारतातील REIT क्षेत्राने गेल्या काही वर्षांत लक्षणीय प्रगती केली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या चौथ्या तिमाहीत देशातील सूचीबद्ध पाच REITs यांनी ४.२५



लाखांहून अधिक युनिटधारकांना एकत्रितपणे २,५६६ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे वितरण केले. संपूर्ण २०२५-२६ आर्थिक वर्षात हे वितरण ८,९०० कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. २२ मे २०२६ पर्यंत भारतीय REIT क्षेत्राचे एकत्रित बाजार भांडवल १.७० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. ब्रुकफिल्ड इंडिया रिअल इस्टेट ट्रस्ट, एम्बसी ऑफिस पार्क्स REIT, नॉलेज रिॲल्टी ट्रस्ट, माइंडस्पेस बिझनेस पार्क्स REIT आणि नेक्सस सिलेक्ट ट्रस्ट हे पाच सूचीबद्ध REITs देशभरातील १८७ दशलक्ष चौरस फूटांहून अधिक ग्रेड-ए कार्यालयीन आणि किरकोळ स्थावर मालमत्तेचे व्यवस्थापन करतात. स्थापनेपासून आजपर्यंत या REITs यांनी युनिटधारकांना ३१,७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे वितरण केले आहे.

# केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते महाड येथे गौरव

## स्मिता सुशांत कवडे यांना 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२६' प्रदान

■ मुंबई (दै. संध्या)

सामाजिक न्याय, समता आणि बंधुभावपूर्ण समाजनिर्मितीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या स्मिता सुशांत कवडे यांना प्रतिष्ठेचा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

विवेक विचार मंच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे तसेच राज्यातील विविध सामाजिक सहयोगी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद २०२६ मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड येथे आयोजित विशेष समारंभात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे आणि पद्मश्री दादा इदाते यांच्या हस्ते स्मिता कवडे यांचा सन्मान करण्यात आला. सामाजिक परिवर्तन, संविधानिक मूल्यांचा प्रसार, समाजातील वंचित घटकांचे सक्षमीकरण आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




स्मिता कवडे या सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेच्या अध्यक्षा असून, दिशा सामाजिक संस्थेच्या सदस्या, सिद्धार्थ सांस्कृतिक संघाच्या सचिव, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सदस्या, महाराष्ट्र नशाबंदी मंडळाच्या सदस्या तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र, मुंबई उपनगर, कुर्ला तालुका शाखेच्या सदस्या म्हणून विविध सामाजिक आणि जनजागृतीच्या क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. सामाजिक न्याय आणि समाजप्रबोधनाच्या क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्काराबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नाशिक – पुणे हायस्पीड रेल्वे मार्गासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग आणि राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे संदर्भात नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दि. १ जुलै रोजी भेट घेवून त्यांच्याकडे चर्चा करणार आहे. केंद्र शासनाच्या स्तरावर पाठपुरावा करून याबाबत यशस्वी तोडगा काढण्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानभवनात आयोजित बैठकीत सांगितले.

नाशिक – पुणे हायस्पीड रेल्वे मार्गाबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस आमदार सर्वश्री माणिकराव कोकाटे, शरद सोनवणे, बाबाजी काळे, विठ्ठल लंघे, शिवाजी आढळराव पाटील, सत्यजित तांबे, प्राजक्त तनपुरे, अमोल खताळ, अक्षय कर्डिले उपस्थित होते. तर आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दूरदृष्यप्रणाली द्वारे बैठकीत सहभाग घेतला.



मंत्री विखे पाटील म्हणाले, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या सोबतही या रेल्वे मार्गाबाबत चर्चा करण्यात येईल. त्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळही दिल्लीला जाऊन त्यांची भेट घेईल. हा रेल्वे मार्ग नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या रेल्वे मार्गामुळे एक वेगवान संपर्क जोडणी पुणे ते नाशिक या दोन महानगरादरम्यान निर्माण होईल. त्यामुळे राज्याचाही गतीने विकास होईल. पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत जनतेच्या भावना विचारात घेवून या प्रश्नाबाबत सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

राहुरी – शनिशिंगणापूर रेल्वे मार्गाच्या संदर्भात बैठकीत चर्चा झाली. या प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या असलेल्या भावना मुख्यमंत्र्याच्या निदर्शानास आणून देणार असल्याचेही मंत्री विखे पाटील म्हणाले.


आमदार दिलीप वळसे पाटील यांनी बैठकीत सहभाग घेताना सांगितले की, नाशिक – पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केली असून जीएमआरटीच्या अडचणी दूर होवू शकतात. ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. काही देशांमध्ये अशा पध्दतीच्या अडचणी असताना रेल्वे मार्गाची कामे झाली असल्याचा दाखला देवून यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा लागेल. मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ यासंदर्भात भेट घेईल असे त्यांनी सांगितले.

# कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रासाठी अतिवृष्टीचा इशारा

## महाराष्ट्रात पुढील आठवडाभर पावसाचा जोर

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र ते उत्तर केरळ किनारपट्टीपर्यंत कमी दाबाचा पट्टा (ऑफ-शोअर ट्रफ) सक्रिय असून, मध्य-ट्रोपोस्फेरिक द्रोणीय रेषा मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकण परिसरातून पसरली आहे. या हवामान प्रणालीमुळे राज्यातील अनेक भागांत ६ जुलैपर्यंत पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकणात बहुतांश ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ते बहुतांश ठिकाणी चांगल्या पावसाचा अंदाज असून, विदर्भात जवळपास सर्वच भागांत व्यापक पाऊस होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात २ आणि ३ जुलै रोजी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, इतर दिवशी तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे, असे आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपसचिव दत्तात्रय कदम यांनी कळवले आहे.

२ ते ४ जुलै दरम्यान कोकणातील काही भागांसाठी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. तसेच २ आणि ३ जुलै रोजी मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ४ ते ६ जुलै या कालावधीत मध्य महाराष्ट्रातील काही भागांतही अतिवृष्टी होण्याचा अंदाज आहे. याशिवाय ३० जून ते ४ जुलै या कालावधीत मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाची शक्यता असल्याने नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुसळधार पावसामुळे सखल भागांत पाणी साचणे, शहरी भागातील रस्ते जलमय होणे, तसेच घाट रस्त्यांवर दरडी कोसळण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे प्रवासाला निघण्यापूर्वी वाहतूक व रस्त्यांची अद्ययावत माहिती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अरबी समुद्रातील प्रतिकूल हवामानामुळे मच्छीमारांनी समुद्रात जाणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. शेतीविषयक सल्ला देताना, भातशेती व भाजीपाल्याच्या रोपवाटिकांमधील अतिरिक्त पाण्याचा त्वरित निचरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मुसळधार पावसाच्या काळात जनावरांना सुरक्षित गोठ्यात ठेवून आवश्यक ती खबरदारी घेण्याचा सल्ला पशुपालकांना देण्यात आला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## स्व. वसंतराव नाईक यांना अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांना त्यांच्या जयंती निमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विधानभवन परिसरात स्व. नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



## सईद खान यांनी घेतली सदस्यत्वाची शपथ

मुंबई (दैनिक संध्या) : विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधानपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य सईद खान यांना विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ दिली. प्रा. शिंदे यांच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी विधिमंडळ सचिव-३, डॉ. विलास आठवले, सचिव-४, शिवदर्शन साठ्ये उपस्थित होते.



## स्व. वसंतराव नाईक यांना मंत्रालयात अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कक्ष अधिकारी निलेश हरड, संदेश उतेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक कक्ष अधिकारी विजय शिंदे, अमोल चव्हाण, विनोद सोरटे यांनीही स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्व. नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह विधिमंडळ सदस्य व विविध अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# संकटांवर मात : पतीच्या अपंगत्वानंतर जिद्दीने फुलवली शेती

## पुरंदरच्या सौ. लता थोपटे यांचा तालुका पातळीवर भात पिकात प्रथम क्रमांक

**काळदरी (दै. संध्या)**

आयुष्यात आलेल्या संकटांसमोर हतबल न होता, जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर एखादी महिला काय चमत्कार करू शकते, याचे आदर्श उदाहरण पुरंदर तालुक्यात समोर आले आहे. पतीला आलेल्या अपंगत्वामुळे कोसळलेल्या संकटाच्या काळात संपूर्ण संसाराचा गाडा नेटाने ओढत, नैसर्गिक शेतीचा मार्ग स्वीकारणाऱ्या सौ. लता दत्तात्रय थोपटे यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत आयोजित खरीप हंगाम पिकस्पर्धेत तालुका पातळीवर भात पिकात प्रथम क्रमांक पटकावला आहे.



कृषी दिनाचे औचित्य साधून पंचायत समिती पुरंदरचे सभापती मा. अमित झेंडे साहेब यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सन २००७ मध्ये पतीला आलेल्या अपंगत्वामुळे थोपटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. शेती कशी करायची आणि संसार कसा चालवायचा, असा यक्षप्रश्न समोर होता. अशा कठीण परिस्थितीत सौ. लता थोपटे यांनी खचून न जाता स्वतः शेतीची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. केवळ पारंपरिक शेती न करता, त्यांनी रासायनिक खतांना फाटा देत संपूर्णपणे नैसर्गिक संसाधनांचा (सेंद्रिय पद्धतीचा) वापर करून भाताचे पीक घेण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्या या अथक परिश्रमाची आणि नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या दर्जेदार भात पिकाची शासनाच्या कृषी विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती. प्रयोगात्मक आणि गुणवत्तेच्या निकषांवर उतरलेल्या या पिकाला तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळाला.

पुरस्कार मिळाल्यानंतर भावना व्यक्त करताना सौ. लता थोपटे म्हणाल्या, "पतीच्या अपंगत्वानंतर परिस्थिती खूप कठीण होती. पण शेतीने मला जगायला शिकवले. नैसर्गिक साधनांचा वापर करून काळ्या आईची सेवा केली आणि आज त्याच मातीने माझ्या कष्टाचे चीज केले. हा सन्मान मला पुढील वाटचालीसाठी अधिक बळ देणारा आहे."

> या कौतुकास्पद यशामुळे सौ. लता थोपटे यांच्यावर संपूर्ण पुरंदर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एका महिलेने जिद्दीच्या जोरावर मिळवलेले हे यश आधुनिक शेती क्षेत्रातील नारीशक्तीचा नवा अध्याय मानला जात आहे.

# अध्यक्षपदी काळे, उपाध्यक्षपदी काकडे तर सचिवपदी तावरे यांची निवड

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील तालुका पंचायत समिती सभापतींची बैठक, पुणे जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडली. या बैठकीमध्ये तालुका पंचायत समितींच्या विविध समस्या, अधिकार व विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व तालुका पंचायत समिती सभापतींनी सर्वानुमते आंबेगाव पंचायत समितीचे ज्येष्ठ सभापती कैलास बुवा काळे यांची, पुणे जिल्हा तालुका पंचायत समिती सभापती असोसिएशनच्या ‘अध्यक्षपदी’ तर हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांची ‘उपाध्यक्षपदी’ तसेच बारामती पंचायत समितीचे सभापती किरण तावरे यांची ‘सचिवपदी’ निवड करण्यात आली. या निवडीनंतर संघटनेच्या वतीने, सर्व तालुका पंचायत समिती सभापतींच्या विविध मागण्यांचे निवेदन, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या दालनात देण्यात आले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांचीही भेट घेऊन विविध मागण्या मांडण्यात आल्या.




यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष कैलास काळे, उपाध्यक्ष युवराज काकडे व सचिव किरण तावरे यांनी ‘पुणे जिल्ह्यातील सर्व तालुका पंचायत समितींना’ भेडसावणाऱ्या विविध अडचणी, समस्या, विकासकामांसाठी आवश्यक निधी, अधिकार व स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून जिल्हा तसेच राज्य पातळीवर प्रभावीपणे पाठपुरावा करून, लवकरच राज्याचे मुख्यमंत्री व दोनही उपमुख्यमंत्री महोदयांची भेट घेणार असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या बैठकीस नवनिर्वाचित अध्यक्ष कैलास काळे, उपाध्यक्ष युवराज काकडे, सचिव किरण तावरे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पुरंदर सभापती अमित झेंडे ,शिरूर सभापती स्वातीताई घावटे, मावळ सभापतीचे सुनीताताई येवले, भोर सभापतीचे मनीषाताई कंक, मुळशी सभापती मंदाताई शेळके, राजगड सभापती सुवर्णाताई राऊत, खेड सभापती विद्याताई मोहिते, इंदापूर सभापती हर्षवर्धन लोंढे आदी उपस्थित होते.

# हरिश्चंद्रगड ट्रेकिंगमध्ये अडकलेले ७ तरुण-तरुणी सुखरूप

**नारायणगाव (दै. संध्या)**

हरिश्चंद्रगड परिसरात ट्रेकिंगसाठी गेलेल्या भिवंडी येथील सात तरुण-तरुणींचा जीव धोक्यात आला असताना ओतूर पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. खिरेश्वर गाव मार्गे हरिश्चंद्रगडावर ट्रेकसाठी गेलेले चार युवक आणि तीन युवती रस्ता चुकल्याने भरकटले होते. ओतूर पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने रात्रभर शोधमोहीम राबवत त्यांना सुखरूप बाहेर काढले.

ओतूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक यांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी येथील सात जण शनिवारी सकाळी सुमारे १० वाजता हरिश्चंद्रगड ट्रेकसाठी गेले होते. ट्रेक पूर्ण करून सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास परतीचा प्रवास सुरू केला; मात्र डोंगराळ भागातील दाट धुके, रिमझिम पाऊस आणि मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे त्यांचा रस्ता चुकला व ते जंगलात भरकटले. परिस्थिती गंभीर होत असताना रात्री सुमारे ९ वाजता त्यांनी डायल ११२ वर संपर्क साधत मदतीची विनंती केली. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तत्काळ हालचाल करत डायल ११२ पथकासह दोन पोलीस अंमलदार आणि दोन होमगार्ड यांना बॅटरी, रेनकोट आणि आवश्यक साहित्यांसह सरकारी वाहनातून घटनास्थळी रवाना केले.

# 'एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल'ने पटकावला 'आउटस्टँडिंग कंपनी' पुरस्कार

**पुणे (दै. संध्या)**

भारताच्या वैद्यकीय तंत्रज्ञान (मेडटेक) क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणाऱ्या कामगिरीत 'एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल'ला 'सर्जिकल रोबोटिक्स टेक्नॉलॉजी (एसआरटी) इंडस्ट्री अवॉर्ड्स २०२६' मध्ये आउटस्टँडिंग कंपनी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. केवळ सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रासाठी समर्पित असलेल्या जगातील अत्यंत प्रतिष्ठित पुरस्कारांपैकी हा एक सन्मान असून, हा बहुमान मिळवणारी ही पहिलीच भारतीय कंपनी ठरली आहे. जागतिक स्तरावर नावाजलेल्या सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रातील नवनिर्माते आणि वैद्यकीय तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांमधून (ज्यामध्ये इनट्युटिव्ह, मेडट्रॉनिक, जॉन्सन अँड जॉन्सन मेडटेक, डिस्टलमोशन, मेरिल, मायक्रोपोर्ट, थिंक सर्जिकल, फुटेक आणि




प्रिसिजन आयओ ग्रुप यांचा समावेश आहे) या भारतीय कंपनीची निवड करण्यात आली आहे. ही कामगिरी कंपनीसाठी एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरली असून, जागतिक सर्जिकल रोबोटिक्सच्या परिदृश्यात एक प्रमुख अग्रगण्य शक्ती म्हणून तिच्या उदयावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. या सन्मानाबद्दल बोलताना 'एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल'चे संस्थापक अध्यक्ष आणि सीईओ डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, ""एसआरटी इंडस्ट्री अवॉर्ड्स'मध्ये 'आउटस्टँडिंग कंपनी"चा पुरस्कार जिंकणे हा एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल आणि भारतासाठी अत्यंत अभिमानास्पद मैलाचा दगड आहे.

# डिसेंट फाउंडेशनने हजारो रुग्णांना दिली नवदृष्टी

**जुन्नर (दै. संध्या)**

■ मोफत नेत्रसेवा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना दर्जेदार व मोफत नेत्रसेवा उपलब्ध करून देत डिसेंट फाउंडेशन, पुणे यांनी जुन्नर तालुक्यात उभारलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, या उपक्रमामुळे हजारो नागरिकांना नवजीवन मिळाले आहे, असे गौरवोद्गार रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रशांत खत्री यांनी काढले.

डिसेंट फाउंडेशन, पुणे व शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रम, जुन्नर येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात २१७



नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ५५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल येथे निवड करण्यात आली. याचबरोबर विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, नारायणगाव यांच्या सहकार्याने हृदयरोग, मूत्ररोग, रक्तदाब, मधुमेह तसेच इतर विविध आजारांची मोफत तपासणी करण्यात आली.

डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी सांगितले की, गेल्या अडीच वर्षांत फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यात ६,००० हून अधिक यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तपासणी, शस्त्रक्रिया, रुग्णांचा प्रवास, निवास, भोजन, चष्मे तसेच शस्त्रक्रियेनंतर एक महिन्यांची औषधे या सर्व सुविधा पूर्णपणे मोफत दिल्या जातात. याशिवाय तिरळेपणावरील शस्त्रक्रियाही विनामूल्य करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे अध्यक्ष प्रशांत खत्री, सचिव पवन गाडेकर, डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी. आतार, शंकरा आय हॉस्पिटलचे शिबिर समन्वयक प्रकाश पाटील व त्यांची टीम, विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. दयानंद गायकवाड व त्यांची टीम, डिसेंट फाउंडेशनचे समन्वयक योगेश वाघचौरे, श्रावण घोगरे तसेच मोठ्या संख्येने नागरिक व नेत्ररुग्ण उपस्थित होते.

> ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना अत्याधुनिक नेत्रसेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्याचा डिसेंट फाउंडेशनचा उपक्रम सातत्याने सुरू असून, त्यामुळे अनेक कुटुंबांच्या जीवनात नव्या आशेचा किरण निर्माण झाला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने चिंतामणी हॉस्पिटलच्या डॉक्टरांचा सन्मान

सासवड (दैनिक संध्या) : १ जुलै हा जागतिक डॉक्टर्स डे असून या दिवसाचे औचित्य साधून सासवड येथील प्रतिथयश अशा चिंतामणी रुग्णालयातील डॉक्टरांचा सन्मान करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सासवडसह पुरंदर व जिल्ह्यात सामाजिक कामात कायम आघाडीवर असलेल्या स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने हा गौरव सोहळा पार पडला. "माणसातला देवमाणूस "या शीर्षकांतर्गत एक प्रतिमा व गुलाब पुष्प देवून या प्रसंगी सर्व डॉक्टर्स मंडळींना सन्मानीत करण्यात आले. चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ भास्कर अत्राम, डॉ दिलीप वाघोलीकर, डॉ संजय रावळ, डॉ विनायक बांदेकर, डॉ संध्या खळदकर, डॉ भालचंद्र दिक्षित, डॉ आम्रपाली वीर कृष्णा शेट्टी यांचा प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप व सचिव हेमंत ताकवले यांनी सन्मान केला. चिंतामणी हॉस्पिटलला नुकतीच वीस वर्षे पूर्ण झाली त्याबद्दल याच कार्यक्रमात केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स तसेच परिचारिका यावेळी उपस्थित होत्या. प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व डॉक्टर्सनी अभिनंदन केले.

### आईच्या स्मरणार्थ अनिल वाघ यांनी प्रवाशांना लोणी ते हडपसर दिला मोफत प्रवास



लोणी काळभोर (दैनिक संध्या) : शेवाळेवाडी व लोणी काळभोर येथील उदयोजक अनिल वाघ यांनी वट सावित्री पोर्णिमा व आई कै. देऊबाई सादबा वाघ यांच्या स्मरणार्थ लोणी काळभोर ते हडपसरला जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना मोफत प्रवास दिला. वाघ यांनी सामाजिक बांधिलकी जपत लोणी काळभोर येथील श्री चिंतामणी सहा आसनी रिक्षा संघामार्फत जवळपास ३० ते ३५ सहासिटर वाहनचालकांनी नागरिकांसाठी मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देत सेवाभावाचे दर्शन घडवले. या उपक्रमामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, परिसरात या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष प्रसंगी अथवा सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून राबविण्यात आलेल्या या मोफत प्रवास योजनेचा लाभ अनेक नागरिकांनी घेतला. अनिल वाघ यांच्या या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, अशा सेवाभावी उपक्रमांना नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्थानिक नागरिकांनी सहासिटर वाघ या उपक्रमाचे स्वागत करत त्यांचे आभार व्यक्त केले . आणि इतरांनीही अशा सामाजिक कार्यातून समाजाला हातभार लावावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. वट सावित्री पोर्णिमे निमित्ताने व आई कै. देऊबाई सादबा वाघ यांच्या स्मरणार्थ लोणी काळभोर ते हडपसरला जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना आज (१ जुलै ) रोजी दिवसभर मोफत प्रवास दिला . सामाजिक बांधिलकी जपत व आई वडिलांच्या आठवणी मनात जपत हे एक छोटेसे कार्य समाजासाठी केले आहे .असे अनिल सादबा वाघ यांनी सांगितले.

### शेतीच्या वादातून वृद्ध शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील लेंडे-बामणे मळा परिसरात शेताच्या बांधाच्या किरकोळ वादातून 60 वर्षीय शेतकऱ्यावर लाकडी काठी व दगडाने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्याच्या मेंदूत रक्तस्राव झाल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी आळेफाटा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रमेश सीताराम शिंदे हे त्यांच्या शेतात ट्रॅक्टरने नांगरणी करत असताना शेजारील नवनाथ जगन्नाथ शेळके व संजय जगन्नाथ शेळके यांनी शेताचा बांध नांगरल्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घातला. हा वाद काही क्षणांतच हाणामारीत बदलला. फिर्यादीनुसार, नवनाथ शेळके यांनी लाकडी काठीने रमेश शिंदे यांच्या पायावर व पाठीवर मारहाण केली. ते खाली पडल्यानंतर त्यांच्या डोक्यात दगडाने वार करण्यात आला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. जखमी रमेश शिंदे यांना प्रथम घरी आणण्यात आले. मात्र रात्री त्यांना चक्कर येणे, उलट्या होणे आणि प्रकृती बिघडल्याने आळेफाटा येथील युनिक हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत त्यांच्या मेंदूत रक्तस्राव झाल्याचे निष्पन्न झाले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून ते जबाब देण्याच्या स्थितीत नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# पुण्यातील बी.टेक प्रथम वर्षाचा विद्यार्थी मानस संधूची नॉर्वेमधील प्रतिष्ठित आशिया-युरोप लीडरशिप ट्रेनिंग कार्यक्रमासाठी भारतातून निवड

**पुणे (दै. संध्या)**

पुण्यातील न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी - एडीवायपीयू (ADYPU) येथे कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) शाखेत प्रथम वर्षात शिक्षण घेणारा मानस संधू याची आशिया-युरोप फाउंडेशन (ASEF) च्या ASEFYLS 2026 कॅपॅसिटी ट्रेनिंग आणि नॉर्वेतील ट्रॉम्सो (Tromsø) येथे होणाऱ्या आर्क्टिक लीडरशिप ट्रेनिंग कार्यक्रमासाठी एएसईएफ लीडर 2026 म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, यावर्षीच्या आर्क्टिक लीडरशिप ट्रेनिंग कार्यक्रमासाठी भारताचे प्रतिनिधित्व करणारा मानस हा भारतातील एकमेव विद्यार्थी आणि युवा नेता ठरला आहे.



या कार्यक्रमात आशिया आणि युरोपमधील निवडक युवा नेते एकत्र येतात. येथे नेतृत्व, धोरणांवरील चर्चा, शाश्वत विकास, भविष्यातील संधी, तंत्रज्ञान आणि विविध देशांतील संस्कृतींमधील सहकार्य अशा विषयांवर चर्चा व प्रशिक्षण दिले जाते. या कार्यक्रमासाठी 52 देशांतून 3,600 हून अधिक अर्ज प्राप्त झाले होते. अशा मोठ्या स्पर्धेत मानस संधूची निवड होणे ही त्याच्यासाठी आणि भारतासाठी मोठी आंतरराष्ट्रीय मान्यता मानली जात आहे. मानस संधूने शिक्षण, तंत्रज्ञान, क्रीडा, संगीत आणि समाजसेवा या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तो राष्ट्रीय स्तरावरील स्केटिंगपटू, प्रशिक्षित संगीतकार, काउंटर स्ट्राईक (CS) ई-स्पोर्ट्स खेळाडू असून फॉरेंजर्स फाउंडेशन या युवा नेतृत्वाखालील संस्थेचा संस्थापक सदस्य आहे. त्याच्या योगदानामुळे या संस्थेशी 800 हून अधिक स्वयंसेवक जोडले गेले आहेत. संस्थेने 330 पेक्षा जास्त सामाजिक उपक्रम राबवले असून महाराष्ट्रातील 900 हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. विशेष गरजा असलेल्या व्यक्तींसाठी केलेल्या कार्याबद्दल या संस्थेला नॅशनल असोसिएशन ऑफ डिसेबल्ड एंटरप्रायझेस कडूनही गौरव मिळाला आहे. ASEF कार्यक्रमासाठी झालेली मानसची निवड ही त्याने विविध क्षेत्रांत केलेल्या कामाची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दखल आहे. या कार्यक्रमामुळे त्याला आशिया आणि युरोपमधील युवा नेत्यांसोबत शाश्वत विकास, तंत्रज्ञान, धोरणांवरील चर्चा आणि विविध संस्कृतींमधील सहकार्य या विषयांवर काम करण्याची आणि अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळणार आहे. मानस संधू याला 'परीक्षा पे चर्चा 2024' उपक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून प्रशंसापत्र मिळाले आहे. तसेच, त्याने महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी - एडीवायपीयू (ADYPU) मध्ये प्रवेश घेतल्यानंतर त्याचे पहिले वर्ष अनेक यश आणि नवीन संधींनी भरलेले ठरले.

मानसने स्टार्टअप आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक प्रकल्पांवर काम केले आहे. तसेच, त्याने तंत्रज्ञानाच्या सहा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये 2,000 हून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. याशिवाय, त्याला अमेरिकेतील ओपन इनसाइट या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सल्लागार कंपनीमध्ये एआय ट्रेनिंग डेव्हलपर म्हणून इंटर्नशिप मिळाली आहे. त्याच्या पहिल्या वर्षातील एक मोठे यश म्हणजे त्याच्या फोर्जक्रिप्ट टीमने तयार केलेले पेडेस्टल हे गेमच्या स्वरूपात वित्तीय शिक्षण देणारे प्लॅटफॉर्म. या प्लॅटफॉर्ममध्ये वित्तीय शिक्षण, पेपर ट्रेडिंग, लाईव्ह पोर्टफोलिओ सिम्युलेशन, शेअर बाजारातील घसरणीची (मार्केट क्रॅश) परिस्थिती आणि एआय आधारित आर्थिक सहाय्यक अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. पेडेस्टल या प्रकल्पाने आयआयटी रुडकी (IIT Roorkee) येथे आयोजित ॲपनोव्हा हॅकाथॉन स्पर्धेत देशभरातील 1,000 हून अधिक टीम्सना मागे टाकत प्रथम क्रमांक मिळवला. ASEF कार्यक्रमासाठी निवड झाल्यानंतर मानस संधू म्हणाला, "ही संधी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे. कारण या कार्यक्रमात तंत्रज्ञान, समाज, शाश्वत विकास आणि भविष्यासंदर्भात विचार करणारे विविध देशांतील युवा नेते एकत्र येतात. माझ्यासाठी ही केवळ नॉर्वेला जाण्याची संधी नाही, तर मी आतापर्यंत केलेल्या कामाचे भारताकडून प्रतिनिधित्व करण्याची संधी आहे.

# वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

## समाजोपयोगी उपक्रमातून विकासभाऊ ताम्हाणे यांनी जपली सामाजिक बांधिलकी

**जुन्नर (दै. संध्या)**

गोळेगाव ग्रामपंचायतचे माजी ग्रामपंचायत सदस्य, डिसेंट फाउंडेशनचे कार्यशील सदस्य व सामाजिक कार्यकर्ते श्री. विकासभाऊ ताम्हाणे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोळेगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. “खरा वाढदिवस तोच, जो समाजासाठी प्रेरणादायी ठरतो!” या संदेशाला साजेसा हा उपक्रम उत्साहात पार पडला.



यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना कंपास पेट्या, पेन, पेन्सिल, वह्या तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने त्यांना मोठा आधार मिळाला.

यावेळी डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई ,जयवंत डोके ,मुकुंद राक्षे ,शामसुंदर लोखंडे, मुख्याध्यापक मोहन नाडेकर, शालेय व्यवस्थापन समिती सदस्या सुप्रिया बिडवई, पल्लवी वाणी, प्रियांका ताम्हाणे, आदी मान्यवर शिक्षकवृंद, ग्रामस्थ, पालक, डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना श्री. विकासभाऊ ताम्हाणे यांनी, “वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपण सर्वांनी हातभार लावला पाहिजे,” असे प्रतिपादन केले.

शाळेचे मुख्याध्यापक मोहन नाडेकर यांनी या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल श्री. विकासभाऊ ताम्हाणे व डिसेंट फाउंडेशनचे आभार मानत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन डिसेंट फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी केले. उपस्थितांनी विकासभाऊ ताम्हाणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.